दैनिक
राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com
● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक
बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२३५ | मंगळवार दि.२३ डिसेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

संपादकीय

नेत्यांनी जनतेला गृहीत धरू नये !

महाराष्ट्रातील नागरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्था असलेल्या नगर परिषदा आणि नगरपंचायत यांच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कौल सत्ताधारी महायुतीच्या बाजूने गेला आहे. राज्यातील प्रमुख नेत्यांनी आपले गड राखण्याचा प्रयत्न या निवडणुकीच्या निमित्ताने केला असला, तरी काही प्रमुख नेत्यांना धक्का देण्याचे कामही मतदारांनी केले आहे.

थोडक्यात...

राज्यात थंडीची लाट

पुणे: राज्यात पुन्हा एकदा कडाक्याच्या थंडीने जोर धरला असून, तापमानात लक्षणीय घट नोंदवली जात आहे. हवामान खात्याने उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये थंडीचा कडाका अधिक वाढण्याचा अंदाज वर्तवला आहे. धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, नाशिक घाट परिसर, अहिल्यानगर, पुणे आणि सोलापूर या आठ जिल्ह्यांत तापमानात मोठी घट होण्याची शक्यता आहे. उत्तर भारतातून वाहणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये थंडीची लाट पसरली आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार ही स्थिती पुढील काही दिवस कायम राहण्याची शक्यता असून नागरिकांनी विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

लवासा प्रकरणी पवार कुटुंबाला दिलासा

मुंबई: लवासा प्रकल्पातील कथित गैरव्यवहाराप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि खासदार सुप्रिया सुळे यांना मुंबई उच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. या प्रकल्पात सत्तेचा गैरवापर आणि आर्थिक लाभ घेतल्याचा आरोप करणारी जनहित याचिका पुराव्याअभावी न्यायालयाने फेटाळून लावली आहे. मुख्य न्यायमूर्तींच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, याचिकाकर्त्यांनी केलेले आरोप सिद्ध करण्यासाठी पुरेसे ठोस पुरावे सादर करण्यात आले नाहीत. लवासा हा देशातील पहिला खासगी हिल स्टेशन प्रकल्प असून, तो सुरुवातीपासूनच भूसंपादन आणि पर्यावरणाच्या मुद्द्यांवरून वादात राहिला आहे. मात्र, सीबीआय चौकशीची मागणी फेटाळल्याने पवार कुटुंबावरील कायदेशीर टांगती तलवार आता दूर झाली आहे.

आयुष्मान भारत योजनेत ५ लाखांपर्यंत मोफत उपचार

मुंबई: राज्यातील नागरिकांना आरोग्य सुरक्षा देण्यासाठी 'आयुष्मान भारत' आणि 'महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना' आता एकत्रित राबवण्यात येत आहेत. या योजनेअंतर्गत पात्र कुटुंबांना प्रतिवर्ष ५ लाख रुपयांपर्यंतचे मोफत उपचार मिळणार असून, यात १३५६ गंभीर आजार व शस्त्रक्रियांचा समावेश आहे. महाराष्ट्र सरकारने या योजनेची व्याप्ती वाढवली असून, आता केशरी, पिवळ्या व पांढऱ्या रेशनकार्डधारकांसह नोंदणीकृत बांधकाम कामगार आणि पत्रकारांनाही याचा लाभ घेता येईल. लाभार्थ्यांनी आपले 'आयुष्मान कार्ड' काढण्यासाठी आधार कार्ड आणि रेशन कार्डसह 'आपले सरकार' केंद्रावर संपर्क साधावा किंवा 'आयुष्मान ॲप'द्वारे ई-केवायसी करावे. सर्व सरकारी आणि योजनेच्या पॅनेलवर असलेल्या खासगी रुग्णालयांत ही सुविधा उपलब्ध आहे.

मुंबईत ठाकरे–राज युतीची मोर्चेबांधणी

मुंबई: मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी शिवसेना (ठाकरे गट) आणि मनसे यांच्यातील युती आता निश्चित मानली जात आहे. 'मातोश्री'वर झालेल्या मॅरेथॉन बैठकीत शिवडीतील जागावाटपाचा तिढा सुटला असून, दोन जागा ठाकरे गटाला तर एक मनसेला देण्यावर एकमत झाले आहे. दादर, माहीम आणि भांडुपमधील जागांसाठी चर्चा सुरू असून, लवकरच भव्य मेळाव्यात युतीची अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे. दरम्यान, खासदार संजय राऊत यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिकेवर तीव्र संताप व्यक्त केला. माणिकराव कोकाटेंना सहा तासांत दिलासा मिळतो, मात्र ४० आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय प्रलंबित राहतो, अशी टीका त्यांनी केली. भाजपचा विजय हा पैशांच्या जोरावर असल्याचा आरोप करत त्यांनी न्यायालयीन विलंबावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

फलोत्पादन अभियानाच्या दुसऱ्या हप्त्यासाठी निधी मंजूर

पुणे । प्रतिनिधी

राज्य सरकारने कृषी उन्नती एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत ६४ कोटी १६ लाख ६६ हजार ६६७ रुपयांच्या निधी वाटपास मान्यता दिली आहे. केंद्र सरकारने या योजनेचा दुसऱ्या हप्त्यासाठी ६० टक्के हिश्शापोटी ३८ कोटी ५० रुपये मंजूर केले आहेत. त्यानुसार राज्य सरकारने ४० हिस्सा अर्थात २५ कोटी ६६ लाख ६६ हजार ६६७ रुपये निधीस मान्यता दिली आहे. याबाबतचा शासन निर्णय सोमवारी (दि.२२) जारी केला आहे. ▶▶ पान २ वर

निधी मधून ही कामे होणार

या निधीमधून फळबाग लागवड, बागांची देखभाल, दर्जेदार रोपे, पायाभूत सुविधा, तंत्रज्ञानाचा प्रसार, तसेच शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी विविध घटक योजनांवर खर्च करण्यात येणार आहे.

“ फलोत्पादन क्षेत्राचा सर्वांगीण विकास करण्याचे उद्दिष्ट

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अर्थात मिशन फॉर इंटिग्रेटेड डेव्हलपमेंट ऑफ हॉर्टिकल्चर (एमआयडीएच) ही केंद्र सरकारची योजना आहे. या योजनेतून फलोत्पादन क्षेत्राचा सर्वांगीण विकास करण्याचे उद्दिष्ट आहे. या योजनेतून फळे, भाजीपाला, फुले, मसाले, औषधी व सुगंधी वनस्पती यांचे उत्पादन, उत्पादकता, गुणवत्ता वाढवण्यावर भर दिला जातो.

सुधीरभाऊंचा भाजपात नाथाभाऊ होतोय का?

मुंबई /बीड । प्रतिनिधी

देशात आणि राज्यात क्रमांक एकचा पक्ष बनलेल्या भाजपमध्ये एकेकाळी एकनाथ खडसे उर्फ नाथाभाऊ यांच्या बाबतीत घडले, तेच सध्या सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या बाबतीत होत आहे का? मुनगंटीवार स्वत:ला एकनाथ खडसेंच्या भूमिकेत नेऊन स्वत:चा राजकीय तोटा करून घेत आहेत का? गेल्या काही महिन्यातील मुनगंटीवारांची पक्षविरोधी भूमिका, वरिष्ठांच्या विरोधात वक्तव्य पाहिल्यानंतर असे प्रश्न विचारले जात आहेत. पक्षात ज्येष्ठ असतानाही त्यांना मंत्रिपदावरून दूर ठेवले गेले अगदी त्यावेळी नाथाभाऊंना पण अशीच वागणूक देण्यात आली होती. त्यावरून भाजपात सुधीरभाऊंचा नाथाभाऊ होतोय की, काय अशी परिस्थिती दिसत आहेत.

विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्रात नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीमध्ये भाजपचा विजयरथ वेगात धावला. ▶▶ पान २ वर

“ नाराजीनाट्याला कुठून सुरुवात?

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत केंद्रीय मंत्री हंसराज अहिर यांचा चंद्रपूर लोकसभेत धक्कादायक पराभव झाला आणि यासाठी बऱ्याच अंशी सुधीर मुनगंटीवार यांना जबाबदार धरण्यात आले. त्यानंतर २०२१ मध्ये एकनाथ शिंदे यांच्या सरकारमध्ये मुनगंटीवार यांना तुलनेने कमी महत्त्वाचे सांस्कृतिक खाते देण्यात आले. मात्र मुनगंटीवार यांची खरी नाराजी समोर आली ती २०२४ च्या लोकसभा निवडणुकी दरम्यान. मला लोकसभा लढवायची नाही, असे त्यांनी वारंवार सांगितले. एक प्रकारे हे पक्षाच्या निर्णया विरोधातील मतप्रदर्शन होते.

“ मंत्रिपद न मिळाल्याची खंत

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत मुनगंटीवार सलग सातव्यांदा विधानसभेत निवडून गेले. जिल्ह्यात भाजपचे देखील सहा पैकी पाच आमदार निवडून आले. त्यानंतर मुनगंटीवार यांची मंत्रिमंडळात वर्णी लागेल अशीच अपेक्षा होती. मात्र मुनगंटीवार यांना मंत्रिमंडळातून वगळण्यात आले आणि तेव्हापासून मुनगंटीवार यांनी अनेक वेळा प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे आपली नाराजी बोलून दाखवली.

शिंदेंचा निवडणुकीवरील खर्च मोजा–काँग्रेस

मुंबई । प्रतिनिधी

आम्ही सत्तेत आलो नाही तरी चालेल; पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ज्या मार्गाने सत्तेत येतात, त्या मार्गाने काँग्रेसला सत्तेत यायचे नाही, अशा शब्दांत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी महायुती सरकारवर टीका केली आहे. एकनाथ शिंदे यांनी निवडणुकीवर केलेला खर्च जर मोजला, तर तो महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पाच्या किती टक्के ठरेल? याची गोळाबेरीज करणेही मनोरंजक ठरेल, असा टोलाही त्यांनी लगावला.

ते माध्यमांशी बोलत होते. त्यांनी नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीत काँग्रेसचे किती नगराध्यक्ष ▶▶ पान २ वर

माणिकराव कोकाटे यांना 'सुप्रीम' दिलासा; कोर्टात शिक्षेला स्थिगिती

दिल्ली । वृत्तसंस्था

अजित पवार गटाचे माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांना सदनिका लाटल्याच्या प्रकरणात मोठा दिलासा मिळाला आहे. मुंबई हायकोर्टाने कायम ठेवलेल्या कोकाटेंच्या २ वर्षांच्या शिक्षेला स्थगिती मिळाली आहे. सुप्रीम कोर्टाने माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला स्थगिती दिली आहे. माणिकराव कोकाटे यांच्या शिक्षेला स्थगिती मिळाल्याने त्यांची आमदारकी वाचली आहे.

माणिकराव कोकाटे यांच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. शिक्षेला स्थगिती मिळावी यासाठी कोकाटे यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. मुंबई उच्च न्यायालयाने कोकाटेंच्या अटकेला स्थगिती दिली होती, मात्र शिक्षा कायम ठेवली होती. त्यानंतर कोकाटे यांच्याकडून उच्च न्यायालयाच्या निकालाला सुप्रीम कोर्टात आव्हान देण्यात आले. त्यानंतर सोमवारी झालेल्या सुनावणीत माणिकराव कोकाटे यांना मोठा दिलासा मिळाला. सुप्रीम कोर्टाने त्यांच्या शिक्षेला स्थगिती दिली. त्यामुळे कोकाटे यांची आमदारकी वाचली. माणिकराव कोकाटे यांना १९ डिसेंबर रोजी हायकोर्टाकडून जामीन मंजूर झाला. त्यामुळे त्यांची अटक टळली होती. मात्र हायकोर्टाने त्यांची शिक्षा कायम ठेवली होती. हायकोर्टाने शिक्षा कायम ठेवल्याने त्यांची आमदारकी जाणार होती. १९ डिसेंबर रोजी झालेल्या सुनावणीत ▶▶ पान २ वर

पैशाच्या वादातून सागर धानुरे यांची निर्घृण हत्या

अवघ्या २४ तासांत दोन्ही आरोपी अटकेत, स्थानिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई

जालना प्रतिनिधी

जालना शहरात पैशाच्या देवाण-घेवाणीतून तरुण सागर धानुरे यांची थंड डोक्याने आखलेली हत्या झाल्याचे उघड झाले असून, अवघ्या २४ तासांत स्थानिक गुन्हे शाखेने या खुनाचा पर्दाफाश करत दोन आरोपींना अटक केली आहे. सुरुवातीला आत्महत्या असल्याचा बनाव करण्यात आला होता; मात्र पोलिसांच्या कसून तपासात तो खोटा ठरला. दि. २१ डिसेंबर रोजी कदीम जालना पोलीस ठाण्यात अकस्मात ▶▶ पान २ वर

दहावी-बारावीच्या परीक्षा केंद्रांतील वर्गात सीसीटीव्ही बसवण्याची सक्ती

निधीची कोणतीही तरतूद न केल्याने शिक्षण संस्थांमध्ये तीव्र नाराजी

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील दहावी-बारावी परीक्षांसाठी केंद्र असलेल्या शाळांवर पुन्हा एकदा निधीविना आदेशांचा बोजा टाकण्यात आला आहे. शिक्षण विभागाने जाहीर केलेल्या नव्या निर्देशांनुसार परीक्षा केंद्र असलेल्या शाळांतील प्रत्येक वर्गखोलीत सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे बंधनकारक करण्यात आले असून, त्यासाठी कोणतीही आर्थिक तरतूद

जाहीर न केल्याने शिक्षण संस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. राज्य माध्यमिक ▶▶ पान २ वर

सोनिया गांधी, राहुल गांधींना नॅशनल हेराल्ड प्रकरणात उच्च न्यायालयाची नोटीस

नवी दिल्ली । प्रतिनिधी

नॅशनल हेराल्ड प्रकरणात काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांना दिल्ली उच्च न्यायालयाने नोटीस बजाविल्याने त्यांच्यासमोरील अडचणी वाढण्याची शक्यता आहे. या प्रकरणी त्यांच्याविरुद्ध दाखल केलेल्या आरोपपत्राची दखल घेण्यास नकार देणाऱ्या ट्रायल कोर्टाच्या आदेशाला

आव्हान देणाऱ्या अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) याचिकेवर उत्तर देण्यास सांगितले.

न्या. रविंद्र दुडेजा यांनी गांधी आणि इतरांना ईडीच्या अर्जावर नोटीस बजावली. या प्रकरणात सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी ईडीच्या वतीने, तर वरिष्ठ वकील अभिषेक सिंघवी आणि आर. एस. चीमा यांनी गांधी यांच्यावतीने बाजू मांडली. या प्रकरणी उच्च न्यायालयाने पुढील सुनावणी १२ मार्च २०२६ रोजी निश्चित केली आहे. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी युक्तिवाद केला की, अंतिम निष्कर्ष असा आहे की आरोपींनी ५० लाखांच्या बदल्यात २००० कोटी रुपयांची मालमत्ता मिळवली ▶▶ पान २ वर

महायुतीमध्ये वादाची ठिणगी!

पिंपरी चिंचवडमधील राष्ट्रवादीचे नेते भाजपच्या वाटेवर, अजित पवार नाराज

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) पदाधिकाऱ्यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याने महायुतीमध्ये वादाची ठिणगी पडली आहे. या पक्षांतरामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपली उघड नाराजी व्यक्त केली असून, भाजपनेते गिरीश महाजन यांनी त्यावर अत्यंत मिश्किल भाषेत प्रत्युत्तर दिले आहे.

पुण्यातील अजित पवार गटाचे काही महत्त्वाचे पदाधिकारी भाजपमध्ये गेल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. यावर बोलताना अजित पवार म्हणाले की, आम्ही मित्रपक्ष म्हणून एकमेकांचे उमेदवार किंवा पदाधिकारी आपल्या पक्षात घ्यायचे नाहीत, असे ठरवले होते. तरीही आमच्या पक्षातले लोक घेतले गेले आहेत. पक्षातले लोक दुसऱ्या बाजूला गेल्यावर नाराज होणारच. या विषयावर मी सविस्तर चर्चा करेन. अजित पवारांच्या या नाराजीवर गिरीश महाजन यांनी आपल्या शैलीत उत्तर दिले. ते म्हणाले की, एव्हरीथिंग इज फेअर इन लव्ह, वॉर अँड इलेक्शन. सध्या नुसत्या प्रेमात आणि युद्धातच नाही, तर निवडणुकीतही सगळे काही माफ असते. आता त्यांनी त्यांच्या पद्धतीने काम करावे आणि आम्ही आमच्या पद्धतीने. महाजन पुढे म्हणाले की, महायुतीमध्ये एक ठरले होते की मुख्यमंत्री शिंदे साहेबांचे, ▶▶ पान २ वर

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२२ डिसेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

गहू: ९५.५० क्विंटल

किमान	कमाल	सरासरी
२,२५०	२,९२५	२,६१४

ज्वारी/हायब्रिड: ६६.५० क्विंटल

२,००१	३,७००	२,८३०

मका/लोकल: ३.५० क्विंटल

१,८००	१,८००	१,८००

तूर : ४.०० क्विंटल

६,३५०	६,३५०	६,३५०

उडीद : २२.०० क्विंटल

४,५००	५,६८०	५,२८२

बाजरी: ३१.०० क्विंटल

२,४४२	४,२००	२,९४९

मुग: १.५० क्विंटल

६,६००	७,७९०	७,१९५

सोयाबीन: २५८.०० क्विंटल

४,२१०	४,६११	४,५२६

हरभरा: २.५० क्विंटल

५,०००	६,८५१	५,८८४

अग्रलेख

नेत्यांनी जनतेला गृहीत धरू नये !

महाराष्ट्रातील नागरी भागातील स्थानिक स्वराज्य संस्था असलेल्या नगर परिषदा आणि नगरपंचायत यांच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कौल सत्ताधारी महायुतीच्या बाजूने गेला आहे. राज्यातील प्रमुख नेत्यांनी आपले गड राखण्याचा प्रयत्न या निवडणुकीच्या निमित्ताने केला असला, तरी काही प्रमुख नेत्यांना धक्का देण्याचे कामही मतदारांनी केले आहे. अनेक नेत्यांनी कुटुंबीयांना उमेदवारी दिली होती, पण जनतेने ती स्पष्टपणे नाकारली. तब्बल २९ नेत्यांच्या नातेवाइकांवर पराभवाची नामुष्की ओढवली आहे. राज्यात आमदारकी-खासदारकीसह स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एकाच कुटुंबाचे वर्चस्व असते. यावेळी मंत्र्यांच्या पत्नी, मुली, सून, भाऊ, मुलगा अशा नातेवाइकांना उमेदवारीची 'खैरात' वाटली गेली. मात्र, मतदारराजाने घराणेशाहीला ठोस सुरुंग लावला आहे. याशिवाय आपल्या मतदारसंघात आपणच सर्वात मोठे असाही काही नेत्यांचा समज झालेला आहे, त्यालाही चपराक देण्याचे काम या निवडणुकीत जनतेने केले आहे. त्यामुळे नेत्यांनी जनतेला नेहमीच गृहीत धरू नये, असा इशाराच यातून मिळाला आहे.

रायगडसारख्या महत्त्वाच्या जिल्ह्यामध्ये अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि शिवसेनेचे नेते भरत गोगावले यांच्यातील राजकीय संघर्ष सर्वांनाच माहीत असला तरी या निवडणुकीच्या निमित्ताने गोगावले यांनी तटकरे यांच्यावर मात केल्याचे दिसून आले. तटकरे यांच्या गडावर आता गोगावले यांची सत्ता आली आहे. सातारा जिल्ह्यातील फलटण नगर परिषदेची निवडणूकही गाजली होती. गेली ३५ वर्षे सत्तेवर असलेल्या रामराजे गटाला बाजूला करून भाजपने आपली सत्ता मिळवली आहे. कोकणातील सिंधुदुर्गमधील कणकवली मालवण भागातील निवडणूकही गाजली. नारायण राणे यांचे दोन सुपुत्र आमदार एकमेकांच्या समोर उभे ठाकल्याने या निकालाबाबत उत्सुकता होती. कणकवलीच्या नगराध्यक्षपदी सर्वपक्षीय उमेदवार असलेले संदेश पारकर निवडून आले आणि तो मंत्री नितेश राणे यांच्यासाठी मोठा धक्का ठरला आहे. पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादीचे नेते जयंत पाटील यांनी नेहमीप्रमाणे आपला ईश्वरपूरचा गड राखला आहे. पण सांगली जिल्ह्यामध्ये मात्र भाजपाने मुसंडी मारली आहे.

या निवडणुकीच्या प्रचारावर जर नजर टाकली, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार आणि त्यांच्या प्रमुख नेत्यांनी ज्या धडाडीने राज्यात नगरपालिका निवडणुकीचा प्रचार केला होता ती धडाडी आणि पुढाकार विरोधी पक्षांच्या एकाही नेत्याला दाखवता आली नाही. या निवडणुकीमध्ये एकनाथ शिंदे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यापेक्षा जास्त जाहीर सभा घेतल्या होत्या. पण काँग्रेसची, उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि शरद पवार यांचा राष्ट्रवादी या पक्षांचे नेते मात्र आपापल्या गडाच्या बाहेर पडून पक्षाच्या विजयासाठी प्रचार करताना दिसले नाहीत. त्याचाच फटका या निवडणुकीत बसला असावा. विधानसभा निवडणुकीमध्ये मतदारांनी जसा पाठिंबा महायुतीला दिला होता तशाच प्रकारचा पाठिंबा या निवडणुकीतही दिल्याचे दिसून आले आहे.

अधिकच कोणत्यातरी अनावश्यक गोष्टींच्या माध्यमातून पराभवाचे विश्लेषण न करता आपण निवडणूक यंत्रणा राबवण्यास कमी पडलो याची कबुली आता विरोधी पक्षांनी द्यायला हवी. लवकरच राज्यातील २९ महानगरपालिकांमध्ये निवडणूक होणार आहेत. तेथील मतदार तर महानगरांमधील मतदार आहेत. महानगरपालिका निवडणुकांमध्ये जर नियोजनशून्य पद्धतीने विरोधी पक्ष निवडणुकीमध्ये उतरले तर त्यांना तेथेही मोठा धक्का बसेल. नगरपालिका निवडणूक ही कार्यकर्त्यांची निवडणूक असते अशा प्रकारची प्रतिक्रिया काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली आहे. पण या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी नेत्यांचा पुढाकार महत्त्वाचा असतो हेसुद्धा लक्षात घ्यायला हवे. आपण जर एकत्र लढलो तर आपल्याला अधिक चांगले यश मिळू शकते याचा दाखला या निवडणुकीने महायुतीच्या नेत्यांनाही दिला आहे. निवडणुकीमध्ये एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील पक्ष जास्त बळकट झालेले दिसतात. भाजपानेसुद्धा आपला पाया अधिक मजबूत केला आहे. भाजप, एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांचा राष्ट्रवादी या पक्षांवर नगरांमधील जनतेने विश्वास दाखवला असल्याने या निवडणुकीत दिलेली आश्वासने पूर्ण करण्याची जबाबदारी आता त्यांनी मनापासून पूर्ण करायला हवीत.

सरपंच दादासाहेब जगताप यांची राष्ट्रवादी काँग्रेस युवक जिल्हा सरचिटणीस पदी नियुक्ती

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील कोहिनी पाटण ग्रुप ग्रामपंचायतचे सरपंच दादासाहेब जगताप यांची राष्ट्रवादी काँग्रेस युवक जिल्हा सरचिटणीस पदी नियुक्ती राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक बीड जिल्हाध्यक्ष बळीराम गवते साहेब यांच्या हस्ते करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष अजित दादा पवार व प्रदेशाध्यक्ष मा. खा. सुनिलजी तटकरे साहेब माजी मंत्री धनंजय मुंडे साहेब यांच्या सुचने प्रमाणे माजी आमदार भीमराव धोंडे साहेब तसेच माजी आमदार बाळासाहेब आजबे काका यांच्या मार्गदर्शनाखाली

सरपंच दादासाहेब जगताप यांची राष्ट्रवादी काँग्रेस युवक जिल्हा सरचिटणीस पदी नियुक्ती राष्ट्रवादी काँग्रेसचे युवक बीड जिल्हाध्यक्ष बळीराम गवते साहेब यांच्या हस्ते करण्यात आली. हि जबाबदारी आरदणीय उपमुख्यमंत्री मा. श्री. अजित (दादा) पवार साहेब यांच्या विचारानुसार पुढील काळात राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या माध्यमातुन पक्ष संघटना मजबुतीने उभी करून सर्व सामान्य माणसाची गरज विविध प्रकारचे कामे पूर्ण करण्यासाठी नियुक्ती करण्यात आली यावेळी आष्टी पाटोदा मतदार संघाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी आमदार भीमराव धोंडे साहेब व माजी आमदार बाळासाहेब आजबे काका तसेच विविध क्षेत्रातील राजकीय सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवरांनी नवनिर्वाचित राष्ट्रवादी काँग्रेस युवक जिल्हा सरचिटणीस सरपंच दादासाहेब जगताप यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत.

कोतकर गट आठ जागांवर ठाम; काय झाला निर्णय

उमेदवारांच्या बैठकीत चर्चा; उमेदवारांनी तयारी केली सुरु

अहिल्यानगर । प्रतिनिधी

महानगरपालिकेच्या निवडणुकीत महायुती व महाआघाडी होणार का नाही याची सर्व मतदारांमध्ये चर्चा असतानाच केडगाव येथे ज्येष्ठ नेते भानुदास कोतकर यांच्या गटाच्या उमेदवारांची बैठक संपन्न झाली. यामध्ये केडगावमधील आठ जागेवर दावा केला असून, भाजप पक्षाकडे आठ जागा देण्याची विनंती केलेली आहे. भाजप आता काय निर्णय घेणार याकडे लक्ष लागले आहे.

भानुदास कोतकर यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीला सागर सातपुते, भूषण गुंड, सविता कराळे, लता बोरगे, प्रतिभा कोतकर, धनश्री कोतकर, महेश सरोदे, भरत कांबळे, गौरी नन्नवरे हे उमेदवार उपस्थित होते. यावेळी बोलताना उमेदवार म्हणाले की, आम्ही आठ जागा घेणार असून, यामध्ये तडजोड होऊ शकत नाही. पक्षाने जर आठ जागा दिल्या तर आम्ही सोळा व सतरामधील आठ उमेदवार तसेच प्रभाग १५ मधील चार उमेदवार असे १२ उमेदवार निवडून आणू. कारण प्रभाग १५ मध्ये कोतकर गटाचे समर्थक व मतदार मोठ्या संख्येने आहेत. त्यामुळे १२ पैकी फक्त आठ जागा मागत आहोत. याबाबत त्यांनी भाजप पक्षाचे फॉर्म भरलेले आहे. तशी मागणी ही केलेली आहे. सध्या महायुतीमध्ये जागा वाटपाचा घोळ चालू असून, यामध्ये शिंदे गट व भाजप युती जरी फिस असली तरी शिंदे गटाला सन्मानजनक जास्त जागा पाहिजे आहेत तर राष्ट्रवादीची ताकद शहरात जास्त आहे, त्या प्रमाणात त्यांनाही जागा हव्यात. तशी त्यांच्या कार्यकर्त्यांची मागणी आहे, त्यामुळे सर्वच पक्षात हा पेच निर्माण झाला आहे. त्यातच केडगावमध्ये कोतकर गटाने जर काही वेगळा निर्णय घेतला तर काय? यामुळे सर्वच पक्षात खळबळ उडाली आहे.

समाजकार्याचे प्रत्यक्ष दर्शन : सेवाश्रमात विद्यार्थ्यांची अभ्यासपूर्ण भेट

बीड । प्रतिनिधी

पुस्तकी ज्ञानापलीकडे जाऊन समाजकार्याची जाणीव प्रत्यक्ष अनुभवातून मिळावी, या उद्देशाने कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक संलग्नित ज्ञानेश्वरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री ज्ञानदेव लिंबाजी तांबारे समाजकार्य महाविद्यालय, तागडगाव (ता. शिरूर कासार) येथील विद्यार्थ्यांनी ब्रम्हनाथ येळंब येथील सेवाश्रम या सामाजिक प्रकल्पास प्रात्यक्षिक भेट दिली.

या अभ्यासभेटीत महाविद्यालयाच्या उपाध्यक्षा कु. ज्ञानेश्वरी तांबारे, डॉ. बी. डी. तांबारे, प्राचार्या बोराडे एस. ए., प्रा. पाटेकर एस. आर., प्रा. मैंदड एस. के., प्रा. गायकवाड ए. बी., तसेच रितेश धनवडे, ए. ए. काकडे व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सेवाश्रम संस्थेचे मार्गदर्शक सुरेश राजहंस यांनी बाल संगोपन, संरक्षण व काळजी अधिनियमाची सविस्तर माहिती देत बाल न्याय समिती व बाल न्याय मंडळ यातील मूलभूत फरक विद्यार्थ्यांना सोप्या शब्दांत समजावून सांगितले. सेवाश्रम उभाराणीमागील संघर्षमय प्रवास, तसेच तमाशा कलावंतांच्या मुला-मुलींच्या संगोपनासाठी केले जाणारे कार्य याविषयी त्यांनी अनुभव कथन केले. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी सेवाश्रमाच्या कार्यपद्धती, सामाजिक जबाबदाऱ्या व संस्थेच्या योगदानाबाबत प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून सखोल माहिती घेतली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. पाटेकर सर यांनी केले, तर विद्यार्थ्यांच्या वतीने प्रा. गायकवाड सर यांनी सेवाश्रम संस्थेचे आभार मानले.

अपक्ष निवडून आणत नगराध्यक्ष पदी बसवलेला कार्यकर्ता विरोधात गेला अन् धनु भाऊंनी करेक्ट कार्यक्रम केला

परळी । प्रतिनिधी

सन २०१२ साली एका कार्यकर्त्याला स्वतःच्या पक्षाकडून नगर परिषद निवडणुकीत तिकीट दिले जात नाही, म्हणून त्याला अपक्ष उभे करून निवडून आणले जाते, इतकेच नाही तर त्याला नगराध्यक्ष केले जाते. काही वर्षांनी तोच कार्यकर्ता आपल्याच नेतृत्वाच्या विरोधात उभा राहून आपल्याच नेत्याची लक्तरे काढायचा प्रयत्न करतो आणि तोंडावर आपटतो, नगराध्यक्ष आणि नगरसेवक अशा दोन्ही निवडणुका हरतो, ही स्टोरी दुसरी तिसरी कुठली नसून परळीतील आहे.

धनंजय मुंडे यांनी त्यांचे कार्यकर्ते असलेल्या दीपक देशमुख यांना उमेदवारी मिळावी यासाठी २०१२ साली मागणी केली होती. मात्र तत्कालीन भाजप पक्ष श्रेष्ठींनी नकार दिल्यानंतर धनंजय मुंडे यांनी दीपक देशमुख यांना अपक्ष उमेदवार म्हणून उभे करून निवडून आणले एवढेच नव्हे तर त्यांना नगराध्यक्ष सुद्धा करून दाखवले. एखाद्या कार्यकर्त्याला स्वतःच्या पक्षाविरोधात बंडखोरी करून अपक्ष म्हणून उभे करणे निवडून आणणे व नगराध्यक्ष करणे ही साधी बाब नाही. या घटनेला आता १३-१४ वर्षे उलटल्यानंतर काही महिन्यांपूर्वी दीपक देशमुख कोणतेही कारण नसताना केवळ राजकीय महत्त्वकांक्षे पाई धनंजय मुंडे यांच्या विरोधात गेले. मधल्या काळात धनंजय मुंडे मंत्री असताना मुंबईकडे जाताना दीपक देशमुख यांचा एक अपघात झाला होता, यावेळी अधिवेशन व कॅबिनेट बैठक सोडून धनंजय मुंडे यांनी दीपक देशमुख यांची ॲम्बुलन्स मुंबईमध्ये पोहोचण्याअगोदर संबंधित रुग्णालयात सर्व व्यवस्था करून धनंजय मुंडे स्वतः तिथे पोहोचले होते. त्यांच्यावरील उपचारांची पूर्ण व्यवस्था करून त्यांना भेटून मगच धनंजय मुंडे रुग्णालयातून गेले. असे असताना देखील कोणतेही कारण नसताना विरोधात गेलेल्या दीपक देशमुख यांनी स्वतः परळीकर असून सुद्धा काही राजकीय लोकांच्या नादी लागून धनंजय मुंडे यांच्या विरोधात एकेरी शब्दात विखारी टीका करण्यास सुरुवात केली, हीच विखरी टीका परळीकरांच्या जिव्हारी लागल्याचे देखील आज बोलले जात असून यामुळेच दीपक देशमुख यांना व त्यांच्या संपूर्ण पॅनलला दारुण पराभवाचा सामना करावा लागल्याची चर्चा आज परळी मध्ये रंगली आहे. दरम्यान आपल्या एखाद्या कार्यकर्त्याला पक्षाविरोधात जाऊन बंडखोरी करून अपक्ष उभा करून नगराध्यक्ष केल्यानंतर काही वर्षांनी तोच कार्यकर्ता आपल्या विरोधात जाऊन काम करत असेल तर त्याला पराभूत करून त्याचा करेक्ट कार्यक्रम करून धडा शिकवण्याचे एक राजकीय वर्तुळ या निमित्ताने पूर्ण झाल्याची आज चर्चा पाहायला मिळत आहे.

खा.लंके प्रतिष्ठानच्या जिल्हाध्यक्षाच्या वाहनाने आजोबाला चिरडले

अहिल्यानगर । प्रतिनिधी

अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील पळवे गावात निलेश लंके प्रतिष्ठानचे जिल्हाअध्यक्ष जवळचे सहकारी कारभारी पोटघन मेजर यांच्या वाहनाने अंदाजे ८० वर्षांच्या आजोबाला चिरडले. त्यांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे.

ही घटना रविवार दि, २१ रोजी सा. ६ :३० च्या सुमारास घडली. ठकाजी रखमाजी तरटे असे मृत व्यक्तीचे नाव असून त्यांचे वय अंदाजे ८० वर्ष असून ते पाडव्याहून मसने फाट्याकडे चालले असताना कारभारी पोटघण मेजर यांची भरधाव वेगाने आलेल्या कारणे त्यांना उडवले. या प्रकरणी सुपा पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे .

पान १ वरून...

फलोत्पादन अभियानाच्या

शासन निर्णयानुसार, या अभियानांतर्गत राज्यात राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाची अंमलबजावणी करण्यात येते, यासाठी यापूर्वीच सुमारे १७०८३.३२ लाख रुपयांच्या कार्यक्रमाला प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्याचाच भाग म्हणून हा वितीय हप्ता देण्यात येत आहे. केंद्र आणि राज्य सरकारने मान्यता दिलेला निधी सर्वसाधारण, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती या प्रवर्गांनुसार वितरित करण्यात येणार आहे. यामध्ये सर्वसाधारण प्रवर्गासाठी सर्वाधिक निधी असून, अनुसूचित जाती व जमातींसाठी स्वतंत्र तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये सर्वाधिक सर्वसाधारण प्रवर्गासाठी ५३.८६ कोटी रुपये तर अनुसूचित जात प्रवर्गासाठी ८.०७ कोटी आणि अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी २.२२ कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे.

शिंदेंचा निवडणुकीवरील

आणि नगरसेवक निवडून आले? याची आकडेवारीही दिली. या निवडणुकीत काँग्रेसचे ४१ नगराध्यक्ष आणि १,००६ नगरसेवक निवडून येणे हा केवळ निकाल नाही, तर जनतेचा स्पष्ट संदेश आहे, पैशांपेक्षा विश्वास मोठा असतो आणि सत्तेपेक्षा विचार महत्त्वाचा असतो, असे त्यांनी म्हटले आहे. सत्तेचा माज, पैशांची उधळण आणि प्रशासनाचा गैरवापर या सगळ्या अडथळ्यांवर मात करत काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी नगरपालिकानगरपंचायत निवडणुकांत विचारधारेच्या ताकदीवर लढा दिला. कोणतीही आर्थिक रसद नसताना, केवळ लोकशाही मूल्यांवर ठाम विश्वास ठेवून उभा राहिलेला हा संघर्ष होता, असेही त्यांनी नमूद केले. एवढा अहंकार शोभत नाही. काँग्रेसने अनेक पावसाळे, उन्हाळे बघितलेले आहेत. आज जो आहे तो उद्या कुठेही नसतो. तो उद्या कुठे नसतो, तो परवा कुठेतरी असतो, हे कालचक्र आहे. या कालचक्रात काँग्रेसला डिवचण्याचे कोणतेही कारण नाही, असे म्हणत त्यांनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला. काँग्रेस हा विचारांशी तडजोड न करता, सत्तेसाठी नव्हे तर संविधानाला अभिप्रेत भारत निर्माण करण्याकरिता, महाराष्ट्राची, भारताची अध्यात्मिकता टिकवण्यासाठी महाराष्ट्र धर्म, सभ्यता आणि पुरोगामित्व घेऊन चालवण्यासाठी काँग्रेस बांधील आहे. आम्ही कुठल्याही प्रकरची तडजोड, गद्दारी, पैसा फेक तमाशा देख, हे अजिबात करायला तयार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

सुधीरभाऊंचा भाजपात

मात्र भाजपचे दिग्गज नेते सुधीर मुनगंटीवार यांच्या चंद्रपूर जिल्ह्यात मात्र भाजपचा विजयरथ रोखण्यात काँग्रेसला यश आले. चंद्रपूर जिल्ह्यातील इतर नगरपरिषदांसह मुनगंटीवार यांच्या विधानसभा मतदारसंघातील मूल आणि बल्लारपूर या दोन नगरपरिषदांमध्येही भाजपचा दारुण पराभव झाला. चंद्रपुरातील पराभवानंतर मुनगंटीवार यांची तोफ विरोधकाऐवजी आपल्याच पक्षातील नेतृत्वाच्या विरोधात चालताना दिसून येत आहे. चंद्रपूरसह मूल आणि बल्लारपूर मधील पराभवाची कारणमीमांसा करताना मुनगंटीवार यांनी पक्षावर त्यांना शक्तिविहीन केल्याचा गंभीर आरोप केला. विधानसभा निकवडणुकीत सातव्यांदा जिंकल्यानंतरही यंदा त्यांना मंत्रिपदापासून दूर ठेवल्याचे शल्यही मुनगंटीवार यांनी बोलून दाखवले. सुधीर मुनगंटीवार एवढ्यावरच थांबले नाही, तर त्यांनी दुसऱ्या दिवशी पुन्हा त्यांची नाराजी वेगळ्या शब्दात बोलून दाखवत एका प्रकारे राज्यातील भाजप नेतृत्वाला इशाराच दिला. मुनगंटीवार यांनी भाजपमधील नाराजांची ते मूठ बांधणार असे राजकीय संकेत दिले.मुनगंटीवार यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याची ही नाराजी भाजपच्या इतर नेत्यांनी वेळीच हेरली आणि सावध प्रतिक्रिया दिली. चंद्रपुरातील पराभवाबद्दल आम्हाला आत्मचिंतन करावे लागेल, आम्ही मुनगंटीवार यांच्यासोबत बोलू. त्यांची भूमिका योग्य असली, तरी पराभवाचा संबंध मंत्रिपद असणे किंवा नसणे याच्याशी जोडता येत नाही असे बावनकुळे म्हणाले. मुनगंटीवार यांच्या अवतीभवती होत असलेल्या सर्व घडामोडी पाहता, २०१४ ते १९ मध्ये जे एकनाथ खडसे यांच्या संदर्भात घडले, तेच आता सुधीर मुनगंटीवार यांच्या बद्दल घडत आहे की काय अशी शंका राजकीय विश्लेषकांच्या मनात येत आहे. इच्छा नसताना लोकसभा निवडणूक लढवणाऱ्या मुनगंटीवारांचा लोकसभा निवडणुकीत दारुण पराभव झाला होता. त्यानंतर विधानसभेत मुनगंटीवार यांनी कमबॅक करत चंद्रपुरात भाजपला यशही मिळवून दिले होते. मात्र राज्यात भाजपची सत्ता आल्यानंतरही मुनगंटीवार यांना मंत्रिमंडळात स्थान मिळाले नाही. त्यानंतर सत्ताधारी भाजपमध्ये असतानाही मुनगंटीवार यांनी एका प्रकारे विरोधी पक्ष नेत्याची भूमिका बजावणी सुरू केली. विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात मुनगंटीवार त्याच रंगात दिसले. कधी त्यांनी महायुती सरकारच्या नवख्या मंत्र्यांना नियमांच्या पेचात अडकवले, तर कधी सभागृहात ज्येष्ठ मंत्र्यांच्या अनुपस्थितीचा मुद्दा उपस्थित करत सरकारला घरचा आहेर दिला. राज्यात गाजत असलेल्या बिबट्यांच्या प्रकरणी तर मुनगंटीवारांनी विद्यमान वनमंत्री आणि त्यांच्या विभागाचे अक्षरशः धिंडवडे काढले. गेल्या काही दिवसांपासून मुनगंटीवार ज्या पद्धतीने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे पक्षाविरोधात बोलत आहेत, ते पाहता मुनगंटीवार नाराज आहे हे वेगळे सांगायची गरज नाही. मात्र त्यामुळे मुनगंटीवार स्वतःचा एकनाथ खडसे करून घेत आहे की, पक्षातील काहीजण मुनगंटीवार यांना हळूहळू एकनाथ खडसेंच्या स्थितीत ढकलत आहेत हा प्रश्न अनेकांना पडला आहे.

पैशाच्या वादातून सागर

मृत्यूची नोंद करण्यात आली होती. तपासादरम्यान पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेने तांत्रिक विश्लेषण व गुप्त माहितीच्या आधारे तपासाची दिशा बदलली आणि हा खून असल्याचे स्पष्ट झाले. तपासात निष्पन्न झाले की, कल्याण गणपतराव भोजने (वय ४१, रा. जुना जालना) आणि मयत सागर धानुरे यांच्यात पैशाच्या कारणावरून वाद सुरू होते. याच वादातून कल्याण भोजने याने कमलेश झाडीवाले याला सागर धानुरे याची हत्या करण्यासाठी २५ लाख रुपयांची सुपारी दिली. दोघांनी मिळून १५ दिवसांपूर्वी खुनाचा कट रचला. दि. २० डिसेंबर रोजी रात्री ९ वाजता, कल्याण भोजने याने सागर धानुरे यास कलावती हॉस्पिटलसमोर बोलावून घेतले. त्यानुसार कमलेश झाडीवाले कारमधून तेथे पोहोचला. सागर धानुरे याच्या शेजारी बसून बोलण्यात गुंतवून गावठी पिस्तुलाने गळ्याजवळ दोन गोळ्या झाडल्या. झटापटीत सागर धानुरे याने आरोपीला पकडण्याचा प्रयत्न केला असता, आरोपीने चाकूने छाती व गळ्याजवळ सपासप वार करून त्याचा खून केला. धक्कादायक बाब म्हणजे, खून केल्यानंतर आरोपी कमलेश झाडीवाले पुन्हा घटनास्थळी आला, तसेच मृतदेहाच्या पोस्टमार्टमसाठी मित्रांसोबत छत्रपती संभाजीनगरलाही गेला, जेणेकरून संशय येऊ नये. कमलेश झाडीवाले याचा शोध घेत असताना तो जालन्याकडे येत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी नागेवाडी टोलनाक्याजवळ सापळा रचून त्याला अटक केली. यापूर्वी कल्याण भोजने यालाही त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेण्यात आले होते. ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सपोनि योगेश उबाळे, पोउपनि राजेंद्र वाघ व पथकाने केली. जालन्यात खुनाची सुपारी, बनावट आत्महत्येचा प्रयत्न आणि पैशासाठी हत्या अशा घटनेने शहर हादरले असून, पोलिसांच्या जलद कारवाईमुळे मोठा गुन्हा उघडकीस आला आहे.

माणिकराव कोकाटे यांना 'सुप्रीम'

कोकाटे यांना दिलासा मिळाला होता. परंतु त्यांची आमदारकी जाणार होती. मुंबई हायकोर्टाच्या निकालानंतर कोकाटेंच्या आमदारकीचा निर्णय विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांना घ्यावा लागणार होता. सिन्नरमधून निवडून आलेल्या कोकाटे यांची आमदारकी धोक्यात होती. त्यामुळे त्यांनी सुप्रीम कोर्टात धाव घेतली होती. मात्र, सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाने कोकाटे यांना दिलासा मिळाला आहे.

मानहानी प्रकरणात दोन्ही आमदार अनुपस्थित

विधानसभेत रमी खेळण्याच्या प्रकरणात माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी आमदार रोहित पवार यांच्या विरोधात दाखल केलेल्या मानहानी प्रकरणात सोमवारी नाशिक न्यायालयात सुनावणी पार पडणार होती. रोहित पवार यांना न्यायालयात हजर राहण्यासंदर्भात समन्स बजावण्यात आले होते. मात्र रोहित पवार न्यायालयात अनुपस्थित होते. तर माणिकराव कोकाटे देखील न्यायालयात अनुपस्थित होते. तसेच खटल्याचे न्यायाधीश देखील रजेवर होते. त्यामुळे या प्रकरणाची पुढील सुनावणी ३० डिसेंबर रोजी पार पडणार आहे.

सोनिया गांधी, राहुल गांधींना नॅशनल

आहे. याबाबत जून २०१४ मध्ये एका व्यक्तीने खासगी तक्रार दाखल केली होती, ज्याची कनिष्ठ न्यायालयाने दखल घेतली आणि नंतर दिल्ली उच्च न्यायालयाने स्थगिती दिली, असा युक्तिवाद केला. दरम्यान, ईडीच्या आरोपपत्रात सोनिया गांधी, राहुल गांधी, सॅम पित्रोदा, सुमन दुबे, सुनील भंडारी, यंग इंडियन आणि डोटेक्स मर्चंडाइज प्रायव्हेट लिमिटेड यांची नावे आहेत. ईडीने आरोप केला आहे की, काँग्रेस नेत्यांनी यंग इंडियन या खासगी कंपनीच्या माध्यमातून केवळ ५० लाख रुपयांना असोसिएटेड जर्नल्स लिमिटेड (एजेएल) विकत घेण्याचा कट रचला आणि त्यांची २००० कोटी रुपयांची मालमत्ता जप्त केली. सोनिया आणि राहुल यांच्याकडे कंपनीचे ७६% शेअर्स आहेत. या प्रकरणात गुन्हेगारीतून मिळालेले उत्पन्न ९८८ कोटी इतके होते. संबंधित मालमत्तेचे बाजार मूल्य ५,००० कोटी इतके होते.

दहावी-बारावीच्या परीक्षा केंद्रांतील

व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने होणाऱ्या दहावी-बारावीच्या परीक्षांसाठी राज्यभरातील हजारो शाळा परीक्षा केंद्र म्हणून वापरल्या जातात. या केंद्रांमध्ये आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध असाव्यात, या कारणास्तव शिक्षण विभागाने निर्देश जारी केले आहेत. काढलेल्या पत्रकात प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही, केंद्र परिसराभोवती पक्की संरक्षक भिंत, खिडक्यांना मजबूत जाळ्या, प्रत्येक विद्यार्थ्याला स्वतंत्र बाक तसेच मुलींसाठी पुरेशी स्वच्छतागृहे अशा अटी घालण्यात आल्या आहेत. या निर्णयावर संस्था चालकांनी मात्र नाराजी व्यक्त केली आहे. प्रत्येक वर्गात सीसीटीव्ही बसवण्याचा निर्णय जर शासनाचा असेल, तर त्यासाठीचा निधीही शासनानेच दिला पाहिजे. आमदार, खासदार किंवा जिल्हाधिकारी निधीतून प्रत्येक शाळेला स्वतंत्र आर्थिक मदत देण्यात यावी. अशी मागणी आता संस्था चालकांकडून करण्यात येऊ लागली आहे.

महायुतीमध्ये वादाची

आमचे किंवा पवारांचे प्रमुख कार्यकर्ते एकमेकांनी घेऊ नयेत. पण जर कोणीतरी सुरुवात केली आणि एक घेतला, की मग समोरून दोन घेतले जातात आणि तिकडून तीन. हे योग्य नाही, पण शेवटी निवडणुकीत या गोष्टी घडतच असतात.

भाजपची कोंडी करण्यासाठी अजित पवारांची काँग्रेसला साद

आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या राजकारणात मोठ्या घडामोडींना वेग आला आहे. पुण्यात भाजपला रोखण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काँग्रेसशी हातमिळवणी करण्याची रणनीती आखल्याची माहिती समोर येते आहे. या संदर्भात अजित पवार यांनी काँग्रेस नेते सतेज पाटील यांच्याशी फोनवरून प्राथमिक चर्चा केल्याचे वृत्त आहे. 'महायुती'मध्ये असूनही भाजपचा वाढता प्रभाव रोखण्यासाठी आणि स्थानिक सत्तेची समीकरणे जुळवण्यासाठी अजित पवारांनी हे पाऊल उचलले असल्याचे बोलले जात आहे. जर काँग्रेस आणि राष्ट्रवादी एकत्र आले, तर भाजपसमोर मोठे आव्हान उभे ठाकू शकते.

दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार दि. २३ डिसेंबर २०२५

धनंजय मुंडे जिथे गुलाल तिथे !

मुंडेंची सभा नको म्हणणारे प्रकाश सोळंके माजलगावात तिसऱ्या स्थानावर

बीड । प्रतिनिधी

नगरपरिषद निवडणुकीमध्ये धनंजय मुंडे यांच्या प्रचाराचा करिष्मा पुन्हा एकदा दिसला असून. परळी गंगाखेड या दोन्ही ठिकाणी धनंजय मुंडे यांनी प्रचारात सक्रिय सहभाग घेतलेल्या नगरपरिषदा निवडून आले आहेत. तर राष्ट्रवादी काँग्रेसचे स्टार प्रचारक असलेल्या धनंजय मुंडे यांना हिनवण्यासाठी काहींनी आम्हाला त्यांची सभा नको असे म्हटले होते, त्यांना मात्र पराभवाची धूळ चाखावी लागली असल्याचे चित्र आहे.

माजलगाव चे आमदार प्रकाश सोळुंके यांनी माजलगाव मध्ये धनंजय मुंडे यांची सभा नको असे माध्यमांच्या समोर धनंजय मुंडे यांना हिनवण्यासाठी मुद्दाम म्हटले होते, त्या प्रकाश सोळंके यांची माजलगाव मध्ये



बीडमध्ये संजय दौंड, ॲड.राजेश्वर चव्हाण यांच्या माध्यमातून यशस्वी नियोजन

प्रचंड दानादान झाले असून, त्यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा पॅनल तिसऱ्या क्रमांकावर फेकला गेला आहे. त्या ठिकाणी शरद पवार गटाच्या शिफा बिलाल चाऊस या नगराध्यक्ष निवडून आल्या असून तुतारी गटाच्या या विजयामध्ये धनंजय मुंडे यांचे सहकारी व जुने मित्र असलेले बाबुराव पोटभरे, मुजमील पटेल या जोडीचा मोठा वाटा आहे. सोळंके यांच्यातील अहंकाराचे व धनंजय मुंडे यांना हिनवणारे वक्तव्य माजलगावातील धनंजय मुंडे समर्थक व नागरिकांना रुचले नाही अशी चर्चा माजलगाव येथील लोक करत आहेत.

विधानसभेच्या वेळी देखील प्रकाश सोळंके यांनी अनेक वेळा विनंती करून धनंजय मुंडे यांच्या पाच सभा माजलगाव मतदार संघामध्ये घेतल्या होत्या त्यामुळेच त्यांना गुलाल लागला आणि आता धनंजय मुंडे यांना नाकारल्याने त्यांना पराभवाची धूळ चाखावी लागली व धारूर मधील निसटत्या पराभवावर समाधान मानावे लागले असे जाणकारांचे मत आहे. दुसरीकडे बीडमध्ये देखील आमदार विजयसिंह पंडित यांनी धनंजय मुंडे व अमरसिंह पंडित यांना विचारात घेत पॅनल उभा केला होता. तसेच निवडणूक निरीक्षक माजी आ. संजय दौंड व राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ॲड राजेश्वर चव्हाण यांच्या माध्यमातून बीड नगर परिषदेच्या संपूर्ण वाटाघाटीमध्ये धनंजय मुंडे सक्रिय सहभागी होते. विशेष म्हणजे दौंड व चव्हाण हे दोघेही परळी मतदारसंघातील असूनही त्यांना मुंडेंनी पूर्णवेळ बीडमध्ये तळ ठोकून या निवडणुकीत लक्ष केंद्रित करण्यास सांगितले होते. धनंजय मुंडे समर्थक असलेले फारूक पटेल अमर नाईकवाडे यांच्या गटातील जवळपास सर्वच नगरसेवक निवडून आले आहेत. त्यामुळे बीड नगरपालिकेतील धनंजय मुंडे यांचा अप्रत्यक्ष सहभाग देखील राष्ट्रवादी काँग्रेसच्या विजयासाठी महत्त्वाचा ठरलेला आहे.

थोडक्यात

सुंदरराव सोळंके साखर कारखाना ग्रीन गोल्ड को.ऑप २०२५ पुरस्काराने सन्मानित

माजलगाव । प्रतिनिधी

लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना लि,सुंदरनगर ग्रीन वर्ड व कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँक लि,पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने या वर्षाचा जागतिक सहकार वर्षानिमित्त सहकार क्षेत्रात उत्कृष्ट योगदानाबद्दल दिला जाणारा ''ग्रीन वर्ड को-ऑप-२००५'' हा पुरस्कार कारखान्यास नुकताच जाहिर करणेत आलेला होता.सदरील पुरस्काराचे वितरण मान्यवरांचे उपस्थितीत पुणे येथे करणेत आले. सहकार मंत्री म.रा. ना.बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते पुरस्कार स्विकारताना कारखान्याचे कार्यकारी संचालक आर.सी.बडगुजर साहेब

सेवानिवृत्त शिक्षक मधुकर बरके यांचे निधन

किल्लेधारूर । प्रतिनिधी



धारूर येथील सेवानिवृत्त जेष्ठ शिक्षक व कवी मधुकरराव बरके यांचे वृद्धापकाळाने रविवारी दुपारी निधन झाले त्यांच्या पार्थ यावर पोलीस स्टेशन मागील वैकुंठ भूमीमध्ये रात्री अंत्यसंस्कारही करण्यात आले त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. धारूर येथील सेवानिवृत्त जेष्ठ शिक्षक व नुकताच कवी संग्रह प्रकाशीत केलेले मधुकरराव बरके गुरुजी यांचे वृद्धापकाळाने रविवारी सायंकाळी निधन झाले त्यांच्या पार्थ यावर पोलीस स्टेशन मागील वैकुंठ भूमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी व सुना नातवंडे असा परिवार आहे त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

एक शाम मोहम्मद रफी साहब के नाम कार्यक्रमाचे मोफत आयोजन

केज । प्रतिनिधी

येत्या २४ डिसेंबर २०२५ बुधवार रोजी चित्रपटसृष्टीतील अजरामर गायक मोहम्मद रफी यांच्या जयंती निमित्ताने एक शाम मोहम्मद रफी साहब के नाम या गीत-संगीताच्या मोफत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास रसिक श्रोत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन आयोजक मुन्ना खतीब यांनी केले आहे.

केज तालुक्यात प्रथमच पार्श्वगायक मोहम्मद रफी यांच्या जयंतीनिमित्ताने या गीत-संगीताच्या कार्यक्रमाचे आयोजन मुन्ना खतीब हे सागर एंटरटेनमेंट ग्रुप च्या माध्यमातून करत आहेत.

या कार्यक्रमात व्हाईस ऑफ रफी म्हणून ओळखले जाणारे इकबाल भाई आणि तौफिक राज यांच्यासह बीड जिल्ह्याच्या गीत संगीत क्षेत्रात अल्पावधीतच आपल्या सुमधुर आवाजाने लोकप्रिय झालेल्या ललिता राणी, चुनू भाई इत्यादी गायक गाणी सादर करणार आहेत तर साऊंड सिस्टम ची जबाबदारी सचिन कावळे सांभाळणार आहेत. गीत-संगीताचा हा सदाबहार कार्यक्रम केज शहरातील मुक्ताई फंक्शन हॉल, धारूर चौक येथे दिनांक २४ डिसेंबर २०२५ बुधवार रोजी संध्याकाळी ०६:०० वाजता आयोजित करण्यात आला आहे.

पार्श्वगायक मोहम्मद रफी यांच्या जयंतीनिमित्ताने केज शहरात प्रथमच एक शाम मोहम्मद रफी साहब के नाम हा मोफत कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून यात रसिक श्रोत्यांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून गीत-संगीताचा मनसोक्त आनंद घ्यावा. असे आवाहन कार्यक्रमाचे आयोजक मुन्ना खतीब यांनी केले असून अधिक माहिती हवी असल्यास ९८३४५७८४५७ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा असे म्हटले आहे.

पिंपरखेडातील वाचनालयात माता भिमाई व राष्ट्रसंत गाडगे बाबा स्मृतिदिन

वडवणी, बीड । प्रतिनिधी

छत्रपती शाहू महाराज सार्वजनिक वाचनालय, पिंपरखेड येथे माता भिमाई रामजी आंबेडकर व राष्ट्रसंत गाडगे महाराज यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. त्यानिमित्त सहाय्यक ग्रंथपाल सौ. शिलाताई सुखदेव उजगरे यांनी माता भिमाई व संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन केले.

या दिनानिमित्त वाचक असणारा विद्यार्थी वर्ग यांनी माता भिमाई आंबेडकर व संत गाडगे महाराजांच्या जीवन चरित्रावर आपले अनमोल विचार मांडले. माता रमाईचा खडतर प्रवास आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची जडणघडण व माता भिमाईचा असणारा वारसा डॉक्टर बाबासाहेब

आंबेडकर यांना लाभल्यामुळे खऱ्या अर्थानं त्यांचे व्यक्तिमत्त्व शारीरिक, मानसिक सुदृढ होते असे विचार यानिमित्त व्यक्त करण्यात आले.

संत गाडगे महाराज यांच्या कार्याबद्दल बोलताना, ग्रंथपाल उजगरे यांनी असे सांगितले की संत गाडगे महाराज यांनी कर्मकांडावर, अंधश्रद्धेवर, रुढीपरंपरेवर, जातीव्यवस्थेवर प्रभावी विचार मांडले. व गावागावात जाऊन स्वच्छतेचा मंत्र, उपदेश न करता तो प्रत्यक्षात घडवून आणण्यासाठी हातात झाडू घेऊन सर्व रस्ते झाडणे व रस्ते झाडण्याबरोबरच सायंकाळी किर्तन आयोजित करून माणसाचे डोके सुद्धा साफ करणे व समाज परिवर्तनाचे महान कार्य या संतांनी केलेलं आहे.

माता भिमाई यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यां महापुरुषांना जन्माला घातल्यामुळे एक महान व्यक्तिमत्व भारत देशाला जडणघडण करण्यासाठी मिळाले. असेही मत व्यक्त करण्यात आले. व संत गाडगे महाराज यांचे विचार सर्वांनी आत्मसात करावे व महापुरुषांचे विचार आत्मसात करून आपल्या जीवनाची वाटचाल चांगल्या पद्धतीने करावी अशी भावना ग्रंथपाल सौ. शिलाताई सुखदेव उजगरे यांनी व्यक्त केली.

पान ६ वरुन...

शेतकऱ्यांची पत

आता नगरपुण्याकडे जाणारा कांदा धामणगाव बाजारपेठेत येणार आहे. बाजार समित्यांमुळे शेतकऱ्यांना योग्य दर मिळून ते आर्थिकदृष्ट्या सक्षम होत असल्याचे त्यांनी नमूद केले.प्रास्ताविकात सभापती रमजान तांबोळी यांनी सांगितले की, आमदार सुरेश धस यांच्या पुढाकारातून धामणगाव उपबाजारासाठी जागा उपलब्ध झाली असून अकरा वर्षांचा करार करण्यात आला आहे. भविष्यात कडा व धामणगाव येथे बाजार समितीची स्वतःची जागा घेऊन व्यापार वाढविण्यात येणार आहे.कार्यक्रमास परिसरातील शेतकरी, व्यापारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी डॉ. अकील सय्यद, कल्याण काकडे, राम शेळके, गौतम आजबे, दत्ता चव्हाण, लक्ष्मण नन्नवरे, सागर आमले, बाळासाहेब निकम, बुवासाहेब शेकडे, आत्माराम फुंदे, रावसाहेब लोखंडे, अंकुश चव्हाण, अशोक ढवन, बबलू तांबोळी, बाबा चांगण,हमीदभाई, समद शेख, पिंटू शेठ भोगावत, प्रशांत गोडसे, सुंदर गर्जे, सहाय्यक निबंधक दीपक पवळ, तुकाराम ढोबळे, राजू खलाटे, बाळासाहेब ढोबळे, प्रल्हाद मुळे, मोहन आमटे, दत्तात्रय खोटे, बंडू तळेकर, संजय महाजन, खंडू हाके, विकास पवार, विजय चितळे, नंदकिशोर करांडे, ज्योतिबा महादिक, उद्धव पवार, संतोष मोरे, अशोक इथापे, राजू झुंजुर्के, शिवलाल कासवा, राम मधुरकर, संजय ढोबळे, मधुकर सायंबर, अशोक पवार, मुरलीधर फसले, अशोक लगड यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.सूत्रसंचालन अनिल ढोबळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सचिव हनुमंत गळगटे यांनी मानले.

नगराध्यक्षपद जे

झाला दोघाही पती-पत्नीला विजयाने हुलकावणी दिली विष्णू वाघमारे यांना नगरपालिकेचा गेल्या अनेक वर्षांचा अनुभव आहे ते अनेक टर्म नगरसेवक देखील होते परंतु यावेळी त्यांना पराभवाचा सामना करावा लागला अशीच परिस्थिती परळी नगरपालिकेतील राष्ट्रवादी शरद चंद्र पवार गटाचे उमेदवार संध्या देशमुख आणि दीपक देशमुख यांच्या बाबतीमध्ये घडला गेला नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार संध्या दीपक देशमुख यांचा जवळपास १५००० मताच्या फरकाने पराभव झाला तर त्यांचे पती दीपक देशमुख यांचा देखील ७०० मताच्या फरकाने पराभव झाला तसे राजकारणात बीड आणि परळी यांचे राजकीय वैर सर्वांना ठाऊक आहे आमदार संदीप क्षीरसागर आणि माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे मात्र यामध्ये दोन्ही ठिकाणी आमदार संदीप क्षीरसागर यांच्या पक्षातील उमेदवाराला पराभव स्वीकारावा लागला

जागतिक सहकार वर्षानिमित्त

कार्यकारी अधिकारी अशोक शेजूळ व सुमित शेंडगे तसेच मुख्य अधिकारी भास्कर गवळी आणि अशोक मगर साहेब उपस्थित होते. हा पुरस्कार केवळ आमच्या संस्थेच्या यशाची पावती नाही, तर आमच्या सभासदांचा, ग्राहकांचा आणि खातेदारांचा विश्वास तसेच कर्मचाऱ्यांच्या परिश्रमांचे सन्मानचिन्ह आहे. हाच विश्वास आम्हाला भविष्यात नव्या जोमाने काम करण्याची नवी उमेद देत राहील.

जवळगाव खून प्रकरणी

माग काढत अवघ्या दोन दिवसांत सदर गुन्ह्यात १) गोरोबा मधूकर डावरे, वय ४५ वर्षे, रा. जवळगाव ता. अंबाजोगाई २) संतोष लिंबाजी मांदळे, वय ३४ वर्षे, रा. बाजीराव चौक, इंडियानगर, लातूर ३) किशोर गोरोबा सोनवणे वय २९ वर्षे, रा. मातांजीनगर, कव्वा नाका, बसवेश्वर चौक, लातूर ४) अमोल विनायक चव्हाण वय २६ वर्षे, रा.दुर्गा तांडा ता. कंधार जि. नांदेड ह.मु. एस.टी. कॉर्टर जुना रेणापुर नाका, लातूर या चार आरोपींना दिनांक २०/१२/२०२५ रोजी ताब्यात घेण्यात आले. चौकशीत आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली आहे.सदर गुन्ह्यातील मयत स्वप्निल ऊर्फ चिंगू अशोक ओव्हाळ वय ३० वर्षे रा. चक्रे गल्ली, रेणापुर ता. रेणापुर जि. लातूर हा मुख्य आरोपी गोरोबा मधूकर डावरे याचे साडूचा मुलगा होता. मुख्य आरोपीचे साडू व त्याचे पत्नीचे निधन झाल्यानंतर स्वप्निल व त्याचा मोठा भाऊ बबलु यांची पालक या नात्याने तो काळजी घेत होता. स्वप्निल याचे लग्न देखील गोरोबा डावरे यानेच करून दिले होते. परंतु लग्नानंतर मयत स्वप्निल हा नेहमी दारू पिऊन त्याचे पत्नी व गोरोबा यांना सतत त्रास देत होता. तसेच स्वप्निल हा घरातील वादामध्ये गारोबा याचे अंगावर धावून आला होता. या गोष्टीचा मनात राग धरून गोरोबा याने वरील आरोपींचे मदतीने स्वप्निल यास रेणापुर येथून जवळगाव येथे आणून त्याला जबर मारहाण करून त्याचा गळा आवळून खून केला आहे, असे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. सदर गुन्ह्यात वरील चारही आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील तपास सपोनि ज्ञानेश्वर कांबळे पो.स्टे. बर्दापूर हे करीत आहेत.सदरील कामगिरी ही पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अंबाजोगाईच्या अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि ज्ञानेश्वर कांबळे, पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे, पोलीस हवालदार मास्ती कांबळे, रामचंद्र केकान, विष्णू सानप, गोविंद भताने पोलीस अंमलदार सचिन आंढळे, विकी सुरवसे, चालक पो.ह. अतुल हराळे सर्व नेमणुक स्थानिक गुन्हे शाखा बीड व पोलीस स्टेशन बर्दापूर येथील पो.ह. शरद कदम, पो.अं. कडुबा म्हेत्रे यांनी केली आहे.

विकासासाठी अधिकाऱ्यांनी

उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्याचा प्रयत्न करण्याची गरज आहे. या गटांना मुद्रा कर्ज योजनेतून अधिकाधिक व्यवसाय आणि उद्योग वासाठी प्रोत्साहित करण्यासोबतच प्रशिक्षित करण्याची गरज आहे. असे सुमन चंद्रा यावेळी म्हणाल्या. विकासाचा आढावा केवळ आकडेवारीवर न घेता प्रत्यक्ष लाभार्थ्यांच्या जीवनात त्याचा किती लाभ झाला आहे याचे चित्रण आगामी काळात मांडावे. अशा सूचना सुमन चंद्रा यांनी यावेळी दिल्या. शक्य तितक्या प्रमाणात आवास योजना तसेच प्रधानमंत्री सूर्यघर आणि शेतकऱ्यांसाठी च्या सुमन योजने अंतर्गत अधिकाधिक लाभ देण्याच्या दृष्टीने अभ्यास करा व माहिती सादर करा, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

गाडगेबाबांनी रस्त्यासह लोकांची मने साफ करण्याचे कार्य केले -प्रा. डॉ. शिनगारे

गेवराई । प्रतिनिधी

स्वच्छतेचे प्रणेते आणि समाजसुधारक संत गाडगेबाबा यांनी रस्ते व परिसर स्वच्छता सोबतच आपल्या किर्तनाद्वारे लोकांची मने साफ करण्याचे कार्य केले. असे प्रतिपादन प्रा. डॉ. नामदेव शिनगारे यांनी केले. ते महिला महाविद्यालय गेवराई च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित संत गाडगेबाबा पुण्यतिथी कार्यक्रम निमित्त प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे महिला महाविद्यालय, गेवराई येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने संत गाडगेबाबा पुण्यतिथी निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी प्रमुख पाहुणे व अध्यक्ष यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी बोलताना प्रा. डॉ. नामदेव शिनगारे म्हणाले की, संत गाडगेबाबा हे २० व्या शतकातील महान संत व

समाजसुधारक होते. त्यांनी भटकंती करुन स्वच्छता व समाजप्रबोधन केले. त्यांनी आपल्या कृतीतून स्वच्छता, सामाजिक सुधारणा व न्यायासाठी मोलाचे योगदान दिले. त्यांनी रस्ते व परिसर स्वच्छता करुन आपल्या कीर्तनाद्वारे प्रबोधन करुन लोकांची मने साफ करण्याचे कार्य केले. असे प्रतिपादन प्रा. डॉ. नामदेव शिनगारे यांनी केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. तात्याराम सोंडगे म्हणाले की, संत गाडगेबाबा हे वैज्ञानिक दृष्टीकोन बाळगणारे मानवतावादी संत होते. त्यांनी आपल्या कीर्तनाद्वारे समाजातील अज्ञात व अंधश्रद्धा निर्मुलनासाठी प्रयत्न केले. मूर्ती पूजा चा विरोध करुन शिक्षणाचा पुरस्कार केला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. संगीता आहेर यांनी केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. शिवाजी दिवाण यांनी केले तर प्रा. बाबू वादे यांनी आभार मानले. कार्यक्रमास सर्व प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती.

सहकार आयुक्त दीपक तावरे यांच्या हस्ते श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचा गौरव

माजलगाव । प्रतिनिधी

सहकार क्षेत्रात गेल्या २५ वर्षांपासून उल्लेखनीय, सातत्यपूर्ण व समाजाभिमुख कार्य करणाऱ्या श्री मंगलनाथ मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.या संस्थेला आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या निमित्ताने कॉसमॉस बँक व ग्रीन वर्ल्ड पब्लिकेशन यांच्या वतीने 'ग्रीन वर्ल्ड २०२५' या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने पुणे येथे आयोजित सहकार मंथन या कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले.

या गौरवपूर्ण कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री ना बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते पार पडले.तर हा मानाचा पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे सहकार आयुक्त दिपक तावरे तसेच कॉसमॉस बँकचे बोर्ड ऑफ मॅनेजमेंट अध्यक्ष सी. ए. मिलिंद काळे यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी संस्थेच्या वतीने व्यवस्थापकीय संचालक ॲड. रविंद्र कानडे,मुख्य सरव्यवस्थापक भिसे तसेच,एच. आर.विभाग प्रमुख राहुल काटकर यांनी हा पुरस्कार स्वीकारला. श्री मंगलनाथ मल्टिस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटीने गेल्या अनेक वर्षांपासून समाजाच्या आर्थिक सबलीकरणासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करत, पर्यावरणपूरक उपक्रम राबवून व सामाजिक बांधिलकी जपत सहकार चळवळीचा आदर्श निर्माण केला आहे. संस्थेच्या या सर्वांगीण, लोकाभिमुख व मूल्याधिष्ठित कार्याची दखल घेत 'ग्रीन वर्ल्ड २०२५ पुरस्काराद्वारे राज्य व राष्ट्रीय स्तरावर गौरव करण्यात आला आहे.

हा पुरस्कार म्हणजे संस्थेवरील सभासदांचा अतूट विश्वास तसेच अधिकारी व कर्मचारी वर्गाच्या अथक परिश्रमांचे फलित असल्याचे नमूद करण्यात आले. यापुढेही संस्था सामाजिक, आर्थिक व पर्यावरणीय जबाबदारीची ही परंपरा अधिक बळकट करत सहकार क्षेत्रात आदर्श निर्माण करेल, असा विश्वास व्यक्त करत संस्थेचे संस्थापक आर. जी. कानडे यांनी हा पुरस्कार सर्व सभासदांना समर्पित केला.

पौर्णिमेनिमित्त ज्ञानेश्वरी पारायण -शिव महापुराण कथा, हरिनाम सप्ताहाचे आयोजन

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी शहरामध्ये शाकंभरी पौष पौर्णिमेनिमित्त श्री. श्री. श्री. दयानंद पुरी महास्वामीजी यांच्या आशिर्वादाने ह.भ.प.नवनाथ महाराज चिनके यांच्या प्रेरणेतून व ह. भ. प. प्रेममूर्ती नामदेव महाराज लबडे यांच्या मार्गदर्शनाखाली वडवणी शहरात प्रतिवर्षीप्रमाणे याही वर्षी ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आणि भव्य कीर्तन महोत्सव तथा अखंड हरिनाम सप्ताह व भव्य शिव महापुरण कथा ह.भ.प.श्री . नामदेव महाराज लबडे यांच्या मधूर वाणीतून संपन्न होणार आहे.याचा आरंभ शनिवार दिनांक २७ डिसेंबर २०२५ रोजी ठिकाण - राम मंदिर चौक येथे संपन्न होणार असून याची सांगता शाकंभरी पौष पौर्णिमा दिनी शनिवार दिनांक ०३ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे. यादरम्यान विविध धार्मिक, अध्यात्मिक व सामाजिक उपक्रमांची मोठी भक्तीची प्रविणी राहणार असून तरी या अध्यात्मिक पर्वणीचा पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी व नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन समस्त कोष्टी समाज बांधव व ग्रामस्थ वडवणी यांच्या वतीने करण्यात आले आहे. या सप्ताहामध्ये व किर्तन महोत्सवामध्ये महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकारांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहेत. या उत्सवासाठी गेल्या महिनाभरापासून जय्यत तयारी करण्यात येत आहे. हा महोत्सव दि. २७ डिसेंबर २०२५ ते ०३ जानेवारी २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आला

आहे. या सप्ताहाच्या निमित्ताने दैनंदिन कार्यक्रम पहाटे ४ ते ६ काकडा भजन, ६ ते ७ विष्णूसहस्त्रनामपाठ, ७ ते ११ ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, ११ ते १ गाथा

भजन, रोज दुपारी २ ते ५ भव्य शिव महापुराण कथा ५ ते ६ हरिपाठ, रात्री ८ ते १० हरिकीर्तन व नंतर हरिजागर होईल. दि. ०३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८ ते १० चौंडेश्वरी मातेची भव्य मिरवणूक निघेल. या सप्ताहामध्ये ज्ञानेश्वरी पारायण नेतृत्व ह.भ.प. धिरज महाराज यादव यांचे आहे तर

गाथा भजन व काकडा नेतृत्व आणि साथ ह.भ.प. दामू अण्णा गोंडे व समस्त भजनी मंडळी व हरिपाठ नेतृत्व व साथ ह.भ.प.सखाराम महाराज बानेगांवकर यांचे आहे. तर मृदंगाचार्य ह.भ.प. तालमणी वैभव महाराज सावळे, ज्ञानेश्वर महाराज लोकरे, बंडू महाराज सातपुते,तर गायनाचार्य अनिरुद्ध महाराज नालेगांवकर, माऊली महाराज घुमरे, माऊली महाराज धारासुरकर, अनिरुद्ध महाराज कारकर, चक्रधर महाराज शिंदे,बप्पा महाराज कोठुळे, बालाजी महाराज सरकटे, पुरुषोत्तम महाराज कोठुळे, विष्णुपंत महाराज निपटे, तात्यासाहेब महाराज मस्के, हरिभाऊ महाराज जाधव, गोपीनाथ महाराज मस्के हे असतील. हा सप्ताह श्री. श्री. श्री. दयानंद पुरी महास्वामीजी व ह.भ.प.नवनाथ महाराज चिनके यांच्या आशीर्वादाने मार्गदर्शक भागवताचार्य ह.भ.प.सुधाकर महाराज चिनके यांच्या प्रेरणेने होत आहे. या अखंड हरिनाम सप्ताहामध्ये दररोज दुपारी २ ते ५ शिव महापुरण कथा ह.भ.प.नामदेव महाराज लबडे यांच्या मधूर वाणीतून संपन्न होईल.

या दरम्यान हरी किर्तन दररोज दि.२७ रोजी ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज जळकेकर, दि.२८ रोजी ह.भ.प. कृष्णा महाराज चवरे, दि.२९ रोजी ह.भ.प. दयानंद महाराज कोरेगावकर ,दि. ३० रोजी ह.भ.प.यशोधन महाराज साखरे, दि. ३१ रोजी ह.भ.प. राजेश महाराज गुंजगेकर , दि. १ रोजी ह.भ.प. उमेश महाराज किर्दत, दि. २ रोजी ह. भ. प. उमेश महाराज दशरथे यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. तर शनिवार दि. ३ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८ ते १० दरम्यान चौंडेश्वरी मातेची भव्य पाळखी मिरवणूक निघेल.व सकाळी १० ते १२ या वेळेत प्रेममूर्ती ह.भ.प.नामदेव महाराज लबडे यांचे काल्याचे किर्तन व त्यानंतर सार्वजनिक महाप्रसादाची पंगत होणार आहे. तरी या अखंड हरिनाम सप्ताहामध्ये सर्व भाविक भक्तांनी सहभागी होण्याचे आवाहन समस्त कोष्टी समाज बांधव व ग्रामस्थ वडवणीच्या वतीने करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांनी शेतीपूरक व्यवसाय करुन आर्थिक विकास करावा.- भगवान मोहळकर

गेवराई । प्रतिनिधी

आजच्या काळामध्ये केवळ पारंपरिक पद्धतीने शेती करणे पुरेसे नाही. त्यामुळे शेती व्यवसायावर आधारित व्यवसाय करुन आर्थिक विकास करावा. यासंदर्भात शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी कृषी विभागाशी संपर्क करावा असे आवाहन श्री. भगवान मोहळकर यांनी केले. ते महिला महाविद्यालय, गेवराई येथील 'आजीवन शिक्षण व विस्तार विभाग' द्वारे आयोजित कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे महिला महाविद्यालय, गेवराई च्या 'आजीवन शिक्षण व विस्तार विभाग' द्वारे 'शेती व्यवसायावर आधारित व्यवसाय मार्गदर्शन कार्यशाळा' आयोजित करण्यात आली होती. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. तात्याराम सोंडगे, सहायक कृषी अधिकारी श्री. भगवान मोहळकर, मोहम्मद शेख, प्रा. डॉ. संजय तळतकर व प्रा. डॉ. दत्ता तंगलवाड यांची उपस्थिती होती. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना

सहायक कृषी अधिकारी श्री. भगवान मोहळकर म्हणाले की, आजच्या जागतिकीकरणाच्या काळात पारंपरिक पद्धतीने शेती केल्यामुळे शेती तोट्यात जात आहे. आर्थिक विकास करण्यासाठी शेतकऱ्यांनी शेती व्यवसायावर आधारित व्यवसाय करावा. त्यासाठी शासनाच्या वैयक्तिक व गट लाभार्थी योजनांचा लाभ घ्यावा. याविषयी अधिक माहिती साठी कृषी विभागातील अधिकाऱ्याशी संपर्क साधावा असे आवाहन केले. प्रा. डॉ. संजय तळतकर म्हणाले की, शेतकऱ्यांनी व्यावसायिक दृष्टिकोन ठेवून शेती करणे आवश्यक आहे. आपल्या खर्चात बचत करुन उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न केले तरच शेतकरी सधन होईल. अध्यक्षीय समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तात्याराम सोंडगे म्हणाले की, शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. तो सक्षम होणे आवश्यक आहे. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांनी शेती व्यवसाय वर आधारित व्यवसायाचे महत्त्व जाणले ते शेतकरी आज सक्षम झाले आहेत. फळबाग लागवड, रेशीम उद्योग, पशुपालन इ. योजनांचा लाभ घेऊन कित्येक गावांनी नावलौकिक मिळविला आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक 'आजीवन शिक्षण व विस्तार विभाग' कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. दत्ता तंगलवाड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. बाबू वादे यांनी तर प्रा. डॉ. रामहरी काकडे यांनी आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थींनी उपस्थित होत्या.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

१७७७ : कॅप्टन जेम्स कूकने प्रशांत महासागरातील किरितीमती बेटांचा शोध लावला.
१८९२ : भारताचे प्रसिद्ध लेखक बनारसीदास चतुर्वेदी यांचा जन्म.
१८९४ : पहिली वैद्यकीय परिषद कोलकत्ता येथे सुरु झाली.
१९०६ : रेजिनाल्ड फेसेंडेन याने प्रथमच एक कवितावाचन, व्हायोलिनवादन आणि एक भाषण यांचे रेडिओ प्रक्षेपण केले.
१९१० : स्वातंत्र्यवीर सावरकर यांना जन्मठेपेची व काळ्यापाण्याची शिक्षा
१९२४ : अल्बानिया या देशाला स्वातंत्र्य मिळाले.
१९५१ : लिबीया हा देश (ईटलीकडून) स्वतंत्र झाला.
१९७९ : सोविएत युनियनने अफगणिस्तानवर आक्रमण केले.
१९८६ : भारतीय ग्राहक दिन.
१९८६ : दिल्ली येथील लोटस टेंपल भक्तांसाठी उघडण्यात आले होते.
१९८९ : मुंबई मध्ये देशातील पहिले मनोरंजन पार्क 'एस्सेल वर्ल्ड' उघडल्या गेले.
१९९९ : काठमांडू येथून नवी दिल्लीला येणार्या 'इंडियन एअरलाइन्स फ्लाईट ८१४' या विमानाचे तालिबानी अतिरेक्यांनी अपहरण करुन ते विमान अफगणिस्तानातील कंदाहार येथे नेले.
२००० : भारतीय बुद्धीबळ खेळाडू विश्वनाथ आनंद यांनी बुद्धिबळातील वर्ल्ड चैंपियनशिप आपल्या नावावर केली.
२००२ : दिल्लीच्या मेट्रोचा शुभारंभ झाला.
२०१४ : अटल बिहारी वाजपेयी आणि मदन मोहन मालवीय यांना भारतरत्न पुरस्कार देण्याची घोषणा करण्यात आली.
२०१६ : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अरबी समुद्रात उभारल्या जाणाऱ्या छत्रपती शिवस्मारकाचे जलपूजन आणि भूमिपूजन करण्यात आले.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

११६६ : जॉन – इंग्लंडचा राजा (मृत्यू: १९ आक्टोबर १२१६)
१८१८ : जेम्स प्रेस्कॉट ज्यूल – ऊर्जेच्या संक्रमणाविषयी सिद्धांत मांडणारे ब्रिटिश पदार्थ वैज्ञानिक (मृत्यू: ११ आक्टोबर १८८९)
१८८० : डॉ. भोगराजू पट्टाभी सीतारामय्या – स्वातंत्र्यसैनिक, इतिहासकार आणि काँग्रेसचे नेते. काँग्रेसच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त त्यांनी लिहिलेला 'हिस्ट्री ऑफ द इंडियन नॅशनल काँग्रेस' हा ग्रंथ महत्त्वपूर्ण आहे. (मृत्यू: १७ डिसेंबर १९५९)
१८९९ : पांडुरंग सदाशिव साने ऊर्फ 'साने गुरूजी' – नामवंत साहित्यिक, बालसाहित्यिक, समाजवादी नेते, समाजसुधारक व स्वातंत्र्यसैनिक. त्यांचे 'श्यामची आई' हे पुस्तक प्रकाशनक्षेत्रातील सर्व विक्रम मोडणारे ठरले आहे. (मृत्यू: ११ जून १९५०)
१९२४ : मोहम्मद रफी – पार्श्वगायक, पद्मश्री (१९६७) (मृत्यू: ३१ जुलै १९८० मुंबई)
१९३० : देशातील प्रसिद्ध लेखिका उषा प्रियंवदा यांचा जन्म.
१९४२ : भारतीय अभिनेते, दिग्दर्शक, नाटककार इंद्र बानिया यांचा जन्म. १९५६: भारतीय चित्रपट सृष्टीचे प्रसिद्ध अभिनेते अनिल कपूर यांचा जन्म.
१९५७ : हमीद करझाई – अफगाणिस्तानचे राष्ट्राध्यक्ष
१९५९ : हिन्दी चित्रपट कलाकार अनिल कपूर यांचा जन्म.
१९८८ : भारतीय क्रिकेट खेळाडू पियुष चावला यांचा जन्म.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५२४ : वास्को द गामा – पोर्तुगीज दर्यावर्दी. अफ्रिकेला वळसा घालून युरोपातुन भारतात येण्याचा मार्ग त्याने शोधला.
१९६७ : बास्किन-रोबिन्स चे सहसंस्थापक बर्ट बास्कीन यांचे निधन. (जन्म: १७ डिसेंबर १९१३)
१९७३ : पेरीयार ई. व्ही. रामस्वामी – स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक आणि द्रविड चळवळीचे प्रणेते (जन्म: १७ सप्टेंबर १८७९)
१९७७ : नलिनीबाला देवी – आसामी कवयित्री व लेखिका (जन्म: २३ मार्च १८९८)
१९८७ : एम. जी. रामचंद्रन – अभिनेते व तामिळनडुचे मुख्यमंत्री (जन्म: १७ जानेवारी १९१७)
१९८८ : प्रसिद्ध लेखक जैनेंद्रकुमार यांचे निधन.
१९९३ : स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक पेरीयार ई. व्ही. रामस्वामी यांचे निधन. (जन्म: १७ सप्टेंबर १८७९)
१९९९ : नायकी इंक चे सहसंस्थापक बिल बोरमन यांचे निधन. (जन्म: १९ फेब्रुवारी १९११)
२००० : कूपर कार कंपनीचे सहसंस्थापक जॉन कूपर यांचे निधन. (जन्म: १७ जुलै १९२३)
२००५ : भानुमती रामकृष्ण – तामिळ व तेलगू चित्रपटांतील अभिनेत्री, दिग्दर्शक, निर्माती, गीतकार, संगीतकार, गायिका व लेखिका (जन्म: ७ सप्टेंबर १९२५).

डिसेंबरमध्ये पिकवा या भाज्या; मिळेल भरपूर आर्थिक फायदा

आपल्या देशातील अनेक राज्यांमध्ये डिसेंबर हा शेतकऱ्यांसाठी खूप फायदेशीर महिना मानला जातो. या हंगामात अशी पिके येतात जी केवळ चेगाने वाढतातच असे नाही तर त्यांना चांगला बाजारभाव सुद्धा मिळतो. डिसेंबरच्या हिवाळ्यात पिकणारी पिके देखील खास असतात कारण त्यांना जास्त काळजी घेण्याची आवश्यकता नसते. थंड वारा, रात्रीचे तापमान आणि सकाळचा सौम्य सूर्यप्रकाश त्यांच्या वाढीसाठी परिपूर्ण असतो. परंतु अनेक शेतकऱ्यांना माहिती नसते कि डिसेम्बर महिन्यात नेमकि कोणती शेती करावी. आज आम्ही तुम्हाला अशा काही पिकांबद्दल सांगणार आहोत ज्याची लागवड तुम्ही डिसेंबर महिन्यात करू शकता. कारण या पिकांना थंडीचे हे दिवस अनुकूल राहतात, थंडीचे वातावरण या पिकांना पोषक असते. या पिकांची लागवड करून तुम्ही अगदी कमी खर्चात चांगले उत्पन्न काढू शकता.

पालक : हिवाळा हा हिरव्या पालेभाज्यांचा असतो आणि पालक त्यापैकी सर्वात प्रसिद्ध आहे. तो कॅल्शियम, लोह, जीवनसत्त्वे अ आणि क यांचा समृद्ध स्रोत आहे. डिसेंबरच्या थंड हवामानात पालकची लागवड सर्वात यशस्वी होते आणि ती सुमारे ६-८ आठवड्यांत कापणीसाठी तयार होते.

भोपळा : भोपळ्याच्या अनेक जाती थंड हवामानात वाढतात. लागवड करणे सोपे आहे आणि वनस्पती जलद वाढते. डिसेंबर मध्ये पेरणी केलेल्या भोपळ्यांना चांगले उत्पादन आणि चांगली बाजारभाव देखील मिळतो.

सलगम : शलगम ही या हंगामातील सर्वात आरोग्यदायी भाज्यांपैकी एक आहे. त्यात अँटिऑक्सिडंट्स, फायबर आणि खनिजे भरपूर असतात. थंड डिसेंबर महिन्यांत लागवड करणे सोपे असते आणि ४०-६० दिवसांत पीक तयार होते.

वांगी : वांगी लागवडीसाठी थंडीचे दिवस सर्वोत्तम मानला जातो. ६ तास सूर्यप्रकाश, चिकणमाती माती आणि चांगल्या निचऱ्याच्या परिस्थितीत वांग्याची झाडे लवकर वाढतात. वांगी लवकर पिकतात आणि वर्षभर त्यांची मागणी कायम असते. त्यामुळे शेतकऱ्यांसाठी वांग्याची लागवड अत्यंत फायदेशीर ठरते. डिसेंबर आणि जानेवारी हा शेतकऱ्यांसाठी कमी मेहनत, कमी खर्च आणि जास्त नफा मिळवण्यासाठी सर्वोत्तम काळ मानला जातो. त्यामुळे हा काळात केलेली शेती फायदेशीर ठरते असं बोललं जाते.

आंबा पिकावरील 'लीफ वेबर'

पूर्वी पाने गुंडाळणारी अळी (लीफ वेबर) ही कीड आंबा पिकावर दुय्यम स्वरूपाची कीड म्हणून ओळखली जाई. मात्र या वर्षी अनेक ठिकाणी या किडीने तीव्र प्रादुर्भाव केल्याचे चित्र आहे. प्रादुर्भावाच्या बाबतीत ही कीड मुख्य किडींशी स्पर्धा करताना आढळली आहे. बदलत्या हवामान परिस्थितीमुळे गेल्या काही वर्षांत या किडीचे प्रादुर्भाव वाढत वाढत असून, ती आंबा पिकासाठी एक गंभीर व लक्षवेधी कीड ठरत आहे. पाने गुंडाळणारी अळीचा प्रादुर्भाव साधारणतः जून महिन्यापासून सुरू होऊन डिसेंबर महिन्यापर्यंत आढळतो. अळीची सुरुवातीची अवस्था पानांवरील हरितद्रव्य खरडून त्यावर उपजीविका करते. त्यानंतर पुढील अवस्थांमध्ये अळी पाने एकत्र गुंडाळून जाळे तयार करते. त्या जाळ्याच्या आत राहून पाने कुरतडते. जवळून निरीक्षण केल्यास प्रभावित पाने सुकलेली, जाळ्याने घट्ट गुंडाळलेली व अळीच्या विष्ठेने भरलेली दिसून येतात.

अंडी अवस्था : मादी पतंग पानांच्या खालच्या पृष्ठभागावर, प्रामुख्याने मध्य शीर किंवा शिरांच्या जवळ, अंडी एकटी-एकटी किंवा गटाने घालते. अंडी हिरवट-फिकट रंगाची, अंडाकृती व चपट्या आकाराची असतात. एक मादी पतंग आपल्या संपूर्ण जीवनकाळात सरासरी ५७ ते ६१ अंडी देऊ शकते. अंड्यांची लांबी सुमारे ०.९७ मि.मी. व रुंदी ०.६७ मि.मी. इतकी असते. अंडी उबविण्याच्या काही तास आधी त्यांचा रंग फिकट गुलाबी होतो. अंडी साधारणतः ३ ते ९ दिवसांत उबतात. अळी अवस्था : नुकत्याच उबवलेल्या अळ्या गुलाबी ते फिकट हिरव्या रंगाच्या असून डोके तपकिरी रंगाचे असते. अळीच्या एकूण ७ अवस्था (इन्स्टार) आढळतात. पूर्ण वाढ झालेल्या अळ्या हिरवट-करड्या रंगाच्या असून, डोके गडद तपकिरी असते. प्रोथोरॅक्सवर तपकिरी ठिपके स्पष्टपणे दिसून येतात. पूर्ण वाढ झालेल्या अळीची लांबी सुमारे २८.६४ मि.मी. व रुंदी ३.५० मि.मी. इतकी असते. अळी अवस्था साधारणतः ४० ते ४२ दिवसांत पूर्ण होते. कोष अवस्था : पूर्ण वाढ झालेली अळी जाळीने गुंडाळलेल्या पानांच्या आत रेशमी व मजबूत कोष तयार करते. या कोषावर अळीची जुनी कात व विष्ठा चिकटलेली आढळते. कोष गडद तपकिरी रंगाचा असून तो पुढील बाजूस रुंद व मागील बाजूस निमुळता असतो. कोषाची लांबी १२.५५ ते १३.८० मि.मी. व रुंदी ४.४५ ते ५.७६ मि.मी. इतकी असते. कोष अवस्था साधारणतः ११ ते १५ दिवसांची असते. प्रौढ अवस्था (पतंग) प्रौढ कीटक मध्यम आकाराचा, करड्या रंगाचा पतंग असतो. त्याचे पुढील पंख तपकिरी रंगाचे, तर मागील पंख फिकट पांढरट रंगाचे असतात. पतंगाच्या शरीराची लांबी ११.८५ ते १३.३८ मि.मी. असून पंख पसरल्यावर रुंदी १०.९३ ते १२.१७ मि.मी. इतकी असते. मादी पतंग नरापेक्षा आकाराने मोठी असते. प्रौढ पतंग साधारणतः ४ ते ५ दिवस जिवंत राहतो. किडीचा संपूर्ण जीवनक्रम ५८ ते ६२ दिवसात पूर्ण होतो.

नुकसानीचे स्वरूप सुरुवातीच्या अवस्थेतील लहान अळ्या पानांच्या वरच्या पृष्ठभागावरील हिरवा भाग (क्लोरोफिल) खरवडून खातात. त्यामुळे पानांवर पांढुरके किंवा करडे ठिपके दिसू लागतात. तिसऱ्या अवस्थेपासून अळ्या रेशीमसदृश धाग्यांच्या साह्याने सुरुवातीला ३ ते ४ पाने एकत्र गुंडाळून जाळे तयार करतात. जसा किडीचा प्रादुर्भाव वाढत जातो, तसतशा अळ्या शेजारच्या पानांकडे स्थलांतर करतात व आधीच्या जाळ्याला नवीन पाने जोडून मोठ्या आकाराचे जाळे निर्माण करतात. या जाळ्याच्या आत राहून अळ्या पानांचे ऊतक कुरतडून खातात.

व्यवस्थापन जाळी केलेली पाने अळी व कोष यांसह काढून गोळा करून नष्ट करावीत.काराबिड भुंगा (शा. नाव – परेना लॅक्टिसिक्टा) आणि रिड्यूव्हिड भक्षक (ओइकामा प्रजाती) यांसारख्या उपयुक्त भक्षकांचे संवर्धन करावे.

निरोगी भविष्यासाठी प्रत्येकाने निर्व्यसनी बनून आरोग्य जोपासावे -मयंक गांधी

कृषीकुल येथे मोफत आरोग्य तपासणी; शेकडोंचा सहभाग

सिरसाळा । प्रतिनिधी

धकाधकीचे जीवनमान आणि वाढते पर्यावरणीय प्रदूषण यामुळे आरोग्याच्या गंभीर समस्या वाढत असल्याची चिंताजनक स्थिती निर्माण झाली आहे. परळी शहरासह परिसरातील अनेक गावांमध्ये हवेचे प्रदूषण धोकादायक पातळीवर पोहोचले असून, याचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे. मोठ्या प्रमाणावर कुष्ठरोगाचे रुग्ण आढळत असून श्वसनाचे गंभीर आजार वाढत असल्याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज असल्याचे मत ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांनी व्यक्त केले.

सिरसाळा येथील कृषीकुल येथे ग्लोबल विकास ट्रस्ट आणि उपजिल्हा रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आरोग्य तपासणी शिबिरात ते उपस्थितांना मार्गदर्शन करत होते. सामाजिक कार्यात सक्रिय असणाऱ्या प्रत्येकाने स्वतःच्या आरोग्याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी उपजिल्हा रुग्णालयाचे समुपदेशक शरद चव्हाण यांनीही उपस्थितांना आरोग्याचे महत्त्व समजावून सांगितले. सोमवार, दि. २२ डिसेंबर रोजी आयोजित या शिबिरात एकूण १२५ पेक्षा जास्त जणांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तपासणीचे पूर्ण अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याची तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी करण्यात येणार असून, ज्यांना आरोग्याची समस्या दिसून येईल त्या सर्व कर्मचाऱ्यांना योग्य वैद्यकीय सल्ला देऊन उपचारासाठी मदत करण्यात येणार असल्याचेही सांगण्यात आले. उद्घाटनप्रसंगी ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी यांची प्रमुख उपस्थिती होती. सुखी आणि निरोगी भविष्य घडवण्यासाठी प्रत्येकाने स्वतःचे आरोग्य जपले पाहिजे, व्यसनांपासून दूर राहून नियमित व्यायाम व प्राणायाम करण्याचा सल्ला त्यांनी दिला. सामाजिक क्षेत्रात स्वयंस्फूर्तीने काम करणारा प्रत्येक स्वयंसेवक समाजासाठी महत्त्वाचा असून, त्याचे निरोगी असणे त्याच्या कुटुंबाच्या सुखासाठीही अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. या आरोग्य तपासणी शिबिरात ग्लोबल विकास ट्रस्टच्या १२५ पेक्षा अधिक कर्मचाऱ्यांनी रक्ताचे नमुने देत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
मंगळवार दि.२३ डिसेंबर २०२५ ५

६ नगरसेवकासह भाजपच्या नगराध्यक्षपदी प्रियंका राक्षे

पत्नी अध्यक्ष तर पती नगरसेवक ; देवयानी कुलकर्णी यांचा ५९०७ मतांनी दणदणीत विजय

जालना । प्रतिनिधी

परतूर नगरपरिषद निवडणूक २०२५ मध्ये भारतीय जनता पक्षाने दणदणीत यश संपादन करत शहराच्या राजकारणावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. नगराध्यक्षपदी भाजपाच्या प्रियंका शहाजी राक्षे यांनी मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला असून नगरसेवक पदासाठीही भाजपाचे सहा उमेदवार विजयी झाले आहेत. या निकालामुळे परतूर नगरपरिषदेत भाजपाची सत्ता अधिक मजबूत झाली असून शहरात भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. नगराध्यक्षपदासह नगरसेवक पदावर भाजपाचे रत्नमाला सतीश सोनवणे, कुरेशी इजरान मुंशी, अग्रवाल स्नेहा सोनू, चव्हाण प्रकाश पंढरीनाथ, डॉ. प्रदीप सुधाकर सातोनकर आणि काळे पूजा सावता यांनी विजय मिळवला. सर्व विजयी उमेदवारांचे शहरभर जल्लोषात स्वागत करण्यात आले. फटाके,

गुलाल, घोषणा आणि कार्यकर्त्यांचा उत्साह यामुळे परतूर शहरात विजयाचा आनंद साजरा करण्यात आला.

ही निवडणूक भाजपा नेते, माजी मंत्री तथा परतूरमंठा विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शनाखाली लढवली गेली. प्रचार काळात आमदार बबनराव लोणीकर आणि भाजपाचे प्रदेश सचिव राहुलभैया लोणीकर यांनी शहरातील सर्व प्रभागांमध्ये दौरे, सभा, कॉर्नर बैठका आणि घराघरात जाऊन प्रचार केला. या प्रचाराला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला असून मतदारांनी विकासाच्या मुद्द्यावर भाजपाला कौल दिल्याचे निकालातून स्पष्ट झाले आहे. परतूर नगरपरिषद निवडणुकीत यंदा विक्रमी मतदानाची नोंद झाली. एकूण ३३,०९६ मतदारांपैकी २३,२७२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला असून अंतिम मतदान टक्केवारी ७०.३२ इतकी राहिली. सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत शांततेत मतदान प्रक्रिया पार पडली. मोठ्या संख्येने झालेल्या मतदानामुळे लोकशाही प्रक्रियेवरील जनतेचा विश्वास अधोरेखित झाला. प्रचारादरम्यान भाजपाने परतूर शहरासाठी गेल्या काही वर्षांत करण्यात आलेल्या विकासकामांची सविस्तर मांडणी केली होती. नगरपरिषदेची सत्ता नसतानाही परतूरसाठी ८०० कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी आणून विविध विकासकामे केल्याचा उल्लेख सभांमध्ये करण्यात आला होता. शहरातील उड्डाणपूल, नाट्यगृह, वसतिगृह, क्रीडा संकुल, नगरपरिषद इमारत, स्मशानभूमी विकास यासह पाणीपुरवठा व सांडपाणी व्यवस्थापनाच्या कामांचा मुद्दा प्रचारात ठळकपणे मांडण्यात आला होता. तसेच सत्ता मिळाल्यास प्रलंबित योजना पारदर्शक पद्धतीने पूर्ण करण्याची हमी भाजपाच्या नेत्यांनी दिली होती. निवडणुकीदरम्यान जाहीर करण्यात आलेली ३० कोटी रुपयांच्या भव्य उद्यानाची घोषणा ही देखील शहरवासीयांमध्ये चर्चेचा विषय ठरली होती. शहराच्या विकासाला नवा आयाम देणाऱ्या या प्रकल्पासह विविध नागरी सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि आरोग्य सेवांना प्राधान्य देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. याच विकासाभिमुख भूमिकेला मतदारांनी पसंती दिल्याचे निकालातून स्पष्ट झाले आहे. नगराध्यक्षपदी निवड झाल्यानंतर प्रियंका शहाजी राक्षे यांनी परतूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. शहरातील मूलभूत सुविधा, पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते आणि नागरिकांच्या दैनंदिन समस्यांवर प्राधान्याने काम करण्यात येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच सर्व नगरसेवकांना सोबत घेऊन परतूरच्या विकासासाठी एकसंघपणे काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. या निकालामुळे परतूर नगरपरिषदेत भाजपाची राजकीय पकड अधिक मजबूत झाली असून येत्या काळात शहराच्या विकासाला गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. निवडणूक निकालानंतर शहरात शांततेत आनंदोत्सव साजरा करण्यात आला असून परतूर नगरपरिषदेच्या नव्या नेतृत्वाकडून नागरिकांना मोठ्या अपेक्षा आहेत.

फक्त भावच नाही, तर शेतकऱ्यांचे उत्पादनही वाढणार–सतीश घाटगे

घनसावंगी । प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या उसाला उच्चांकी भाव देण्याबरोबरच येणाऱ्या काळात समृद्धी साखर कारखाना शेतकऱ्यांचे उत्पादनही वाढवण्याचा प्रयत्न करणार असल्याचे, समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांनी सांगितले. रविवारी राणी उंचेगाव येथे समृद्धी साखर कारखान्याच्या विभागीय कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी आयोजित शेतकरी संवाद मेळाव्यात ते बोलत होते. कारखान्याचे व्हाईस चेअरमन महेंद्र मेठी यांच्या हस्ते हस्ते या कार्यालयाचे उद्घाटन झाले. यावेळी परिसरातील ऊस उत्पादक शेतकरी, भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

घनसावंगी तालुक्यातील शेतकऱ्यांची शेत- पानंद रस्त्याची सर्वात मोठी अडचण होती. समृद्धी कारखान्याने स्वखर्चातून दोनशे किमी पेक्षा जास्त शेतकऱ्यांचे रस्ते खुले करून दिले. शेतकऱ्यांच्या उसाला मराठवाड्यात उच्चांकी भाव दिला. आता शेतकऱ्यांच्या समोर असेलल्या ऊस लागवडीचा, पत पुरवठा आणि खते आणि बियाणाचे प्रश्न सोडविण्यासाठी समृद्धी साखर प्रयत्न करणार असल्याचे सांगून शेतकऱ्यांच्या उसाला जास्तीत जास्त भाव देण्याबरोबर त्यांचे उत्पादनही वाढवणार असल्याचे सतीश घाटगे यांनी सांगितले. समृद्धी साखर कारखाना शेतकऱ्यांना ऊस लागवडीसाठी सुधारित जातीचे उसाचे बेणे , कंपोस्ट खताच्या पुरवठा करण्याबरोबर तज्ञामार्फत लागवडीचे योग्य मार्गदर्शन शेतकऱ्यांना करणार असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांनी उसाचे पाचट न जाळता शेतातच कुजवण्याचे आवाहन केले. तसेच ऊस गाळपासाठी शेतकऱ्यांची स्पर्धा सुरु झाली आहे, उशिरा ऊस तुटल्यास नुकसान होईल, अशी भीती त्यांच्यात आहे. शेतकऱ्यांनी ऊस गाळपाची घाई करू नये.

एकही शेतकऱ्यांचा ऊस गाळपाविना उभा राहणार नाही. असा शब्द सतीश घाटगे यांनी यावेळी दिला. समृद्धीच्या युनिट नंबर - २ चे काम प्रगतीपथावर असून लवकरच समृद्धी कारखान्याची गाळप क्षमता दुप्पटीने वाढणार आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर अतिरिक्त उसाचा प्रश्न कायमचा सुटेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अनेक गावात पाणी अडवल्या जात नाही म्हणून पिण्याच्या आणि शेतीच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होतो. हा प्रश्न सोडविण्यासाठी शिरपूर पॅटर्न पद्धतीने १० कोटीची जलसंधारण मोहीम हाती घेण्याचा प्रयत्न समृद्धी साखर करणार आहे. त्यासाठी शेतकऱ्यांची साथ आवश्यक आहे. या मोहिमेतून ३० गावात सिमेंटचे बंधारे बांधण्याचा मानस असल्याचे सतीश घाटगे यांनी सांगितले.

दारूच्या नशेत जमिनीचे खरेदीखत केल्याच्या धक्क्यातून शेतकऱ्याने जीवन संपविले

ताडकळस। प्रतिनिधी

सतत दारू पाजून नशेत असताना जमिनीचे खरेदीखत करून घेतल्याच्या धक्क्यातून एका शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना ताडकळस येथे घडली आहे. याप्रकरणी मृताच्या पत्नीने दिलेल्या फिर्यादीवरून तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी एका आरोपीला अटक केली आहे.

मृताची पत्नी आशा मारोती दळवी (वय ३४) यांनी याप्रकरणी ताडकळस पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी या तक्रारीवरून तिन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. मुख्य आरोपी चंद्रकांत सोनटक्के याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, ताडकळस येथील रहिवासी मारोती किशनराव दळवी (वय ३७) यांना आरोपी चंद्रकांत भीमराव सोनटक्के, ज्ञानेश्वर किशनराव आंबोरे आणि अंगद भीमराव सोनटक्के हे गेल्या काही दिवसांपासून जाणीवपूर्वक अतिप्रमाणात दारू पाजत असत. मारोती यांची जमीन हडपण्याच्या उद्देशाने या तिघांनी त्यांना शारीरिक व मानसिक त्रास देण्यास सुरुवात केली होती. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपींनी संगनमत करून मारोती यांना दारूच्या नशेत ठेवले आणि जमिनीचा कोणताही मोबदला न देता त्याचे खरेदीखत स्वतःच्या नावावर करून घेतले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर मारोती हे प्रचंड मानसिक तणावात होते. याच तणावातून त्यांनी १८ डिसेंबर रोजी सकाळी ८ वाजेच्या सुमारास टोकाचे पाऊल उचलत आपली जीवनयात्रा संपवली. ठाणेदार गजानन मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सतीश तावडे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

सीसीआय खरेदी तातडीने सुरू करा !

शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी सिल्लोडात शिवसेनेचा रास्ता रोको

सिल्लोड। प्रतिनिधी

शासकीय सीसीआय खरेदी केंद्र शेतकरी सहकारी जिनिंगसह इतर जिनिंगमध्ये तातडीने सुरू करावे, शेतकऱ्यांचा कापूस हमीभावाने खरेदी करून त्यांना आर्थिक समृद्धीकडे नेण्याचा ठोस प्रयत्न करावा, तसेच शेतकऱ्यांना वेठीस धरणाऱ्या ग्रेडर व दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, या रास्त व हक्काच्या मागण्यांसाठी राज्याचे माजी मंत्री तथा शिवसेनेचे आमदार अब्दुल सत्तार यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेच्या वतीने सिल्लोड शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात सोमवारी (दि.२२) दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात ''शेतकऱ्यांचा कापूस हमीभावाने खरेदी झालाच पाहिजे'', ''शासकीय खरेदी केंद्र सहकारी जिनिंगमध्ये चाचणी सुरू केलीच पाहिजे'', ''शेतकऱ्यांना अडवणाऱ्या ग्रेडरवर कारवाई झालीच पाहिजे'', ''सीसीआय केंद्रातील दोषी अधिकाऱ्यांना शिक्षा करा'' अशा ठणकावून सांगणाऱ्या मागण्या करण्यात आल्या. किसान शेतकरी के सन्मान में शिवसेना मैदान में'', ''शिवसेनेचा विजय असो'', ''आमदार अब्दुल सत्तार तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है'', अशा आक्रमक घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला. रास्ता रोको आंदोलनामुळे जळगावछत्रपती संभाजीनगर महामार्गावरील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकाच्या दोन्ही बाजूंना काही किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. मात्र, एकाही वाहनचालकाला किंवा नागरिकांना त्रास होऊ न देता शिस्तबद्ध आंदोलन करणे, हे या आंदोलनाचे वैशिष्ट्य ठरले. आंदोलन सुरू असतानाच रुग्णाला घेऊन येणारी रुग्णवाहिका दिसताच आमदार अब्दुल सत्तार यांनी आंदोलकांना तात्काळ रस्ता मोकळा करून देण्याचे आदेश दिले. कोणताही अडथळा न आणता रुग्णवाहिकेला मार्ग देण्यात आला आणि रुग्णालयात उपचारासाठी पाठवण्यात आले. रास्ता रोको आंदोलनादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिनेश कुमार कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शेषराव उदार यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता.

स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कारांसाठी अर्ज पाठवण्याचे आवाहन

नवी दिल्ली । प्रतिनिधी

मराठी भाषेतल्या साहित्यनिर्मितीबद्दल राज्य शासनाच्यावतीने दिल्या जाणाऱ्या यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार २०२५ यासाठी अर्ज मागवण्यात आले आहेत. १ जानेवारी ते ३० डिसेंबर २०२५ या कालावधीत प्रकाशित झालेली प्रथम आवृत्ती पुस्तके या स्पर्धेसाठी पात्र आहेत. मुंबईच्या रवींद्र नाट्यमंदिरात येत्या ३० जानेवारी २०२६ पर्यंत महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडे पुस्तके पाठवावीत, असे आवाहन मंडळाच्या सचिवांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे. मंडळाच्या कार्यालयात तसेच मुंबई शहर आणि मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळता इतर ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयात तर 'सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कारा'साठी महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली येथे प्रवेशिका पाठविता येणार. प्रवेशिका विनामूल्य उपलब्ध आहेत. लेखक आणि प्रकाशक या स्पर्धेसाठी प्रवेशिका पाठवू शकतात.

'सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार' हा खास बृहन्महाराष्ट्रातील उत्कृष्ट साहित्य निर्मितीसाठी प्रदान करण्यात येणार आहे. या श्रेणीत उत्कृष्ट साहित्य निर्मितीसाठी साहित्याच्या सर्व प्रकारातील साहित्यकृती या पुरस्कारासाठी पाठविता येणार असून उत्कृष्ट साहित्यकृतीस 'सयाजी महाराज गायकवाड पुरस्कार' (पुरस्कार रक्कम १,००,००० रूपये) प्रदान करण्यात येणार आहे. बृहन्महाराष्ट्र क्षेत्रातील विजेत्यांसाठी 'सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार' (सर्व साहित्य प्रकार) साठी निवड केली जाईल. प्रवेशिका पूर्णत: भरुन आवश्यक साहित्यासह सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या कार्यालयात किंवा महाराष्ट्र परिचय केंद्र नवी दिल्ली यांच्याकडे ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पोहचतील अशा बेताने पाठवाव्यात. लेखक / प्रकाशक या स्पर्धेसाठी प्रवेशिका दाखल करु शकतात. महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर 'नवीन संदेश' या सदरात 'स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाड:मय पुरस्कार नियमावली व प्रवेशिका' या शीर्षखाली व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या संकेतस्थळावर प्रवेशिका व नियम पुस्तिका उपलब्ध आहे. यासह या स्पर्धेची नियमावली व प्रवेशिका सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाट्य मंदिर इमारत, दूसरा मजला, सयानी रोड, प्रभा देवी, मुंबई-४०० ०२५ यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. तसेच, बृहन्महाराष्ट्रातील लेखक व प्रकाशकांसाठी महाराष्ट्र परिचय केंद्र, ए/८, स्टेट एम्पोरिया बिल्डींग, बाबाखडक सिंह मार्ग, नवी दिल्ली या कार्यालयातही स्पर्धेची नियमावली व प्रवेशिका उपलब्ध आहे.

स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजनेअंतर्गत एकूण चार विभागात ३५ साहित्य प्रकारांसाठी प्रवेशिका मागविण्यात आल्या आहेत. प्रौढ वाङ्.मय विभागात एकूण २२ साहित्य प्रकार असून प्रत्येकी १ लाख रुपये या प्रमाणे एकूण २२ लाख रूपयांची पुरस्कारांची रक्कम आहे.बाल वाङ्मय विभागात एकूण ६ साहित्य प्रकारात प्रत्येकी ५० हजार रुपये याप्रमाणे एकूण ३ लाख रूपयांची पुरस्कार रक्कम आहे.

महानगरपालिका निवडणूक अनुषंगाने नमुना मतपत्रिका छपाईवर निर्बंध

जालना । प्रतिनिधी

राज्य निवडणूक आयोगाने महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक -२०२५ साठी निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आलेली आहे.

जालना शहर महानगरपालिका निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या कार्यकर्ते व हितचिंतकाने, मुद्रणालयाचे मालकाने व इतर सर्व माध्यमाद्वारे छपाई करणाऱ्या मालकाने तसेच प्रकाशकाने नमुना मतपत्रिका छापताना इतर उमेदवाराचे नाव व त्यांनी नेमून देण्यात आलेले चिन्ह वापरणे. नमुना मतपत्रिकेसाठी मा.निवडणूक आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद वापरणे. मा. निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या कागदाच्या आकारामध्ये नमुना मतपत्रिका छापणे. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १६३ अन्वये नमुना मतपत्रिका छपाईवर निर्बंध आदर्श आचारसंहिता संपेपर्यंत घालण्यात आले आहेत, असे आदेश जिल्हादंडाधिकारी आशिमा मित्तल यांनी जारी केले आहेत.

येणारा काळ लोकविश्वास आणि लोक विकासाचा-अमरसिंह पंडित

भिमकन्येच्या नेतृत्वात नव्या राजकारणाची घडी बसली

बीड । प्रतिनिधी

येणारा काळ लोकांनी व्यक्त केलेल्या विश्वासाचा आणि आम्ही दिलेले आश्वासन पूर्तीचा असणार आहे. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार या कडक शिस्तीच्या नेतृत्वात बीडचा कायापालट आपणाला करायचा आहे, यासाठी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी सज्ज रहावे अशा सूचना नवनिर्वाचितांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी दिल्या. भिमकन्येच्या नेतृत्वात नव्या राजकारणाची घडी यानिमित्ताने बसली असून येणाऱ्या काळात बीड तालुक्यात नव्या दमाच्या नेतृत्वांना संधी देण्याची भुमिका पक्ष घेत असल्याचे सुतोवाच अमरसिंह पंडित यांनी यावेळी व्यक्त केले. राष्ट्रवादी काँग्रेस आणि मित्रपक्षाच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा श्रीमती प्रेमलता ताई पारवे आणि २१ नगरसेवकांचा सत्कार सोहळ्यात ते बोलत होते. पक्षाच्यावतीने शिवछत्र येथे नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा

भव्य सत्कार सोहळा संपन्न झाला.

बीड नगर परिषद निवडणुकीतील नवनिर्वाचित नगराध्यक्षा श्रीमती प्रेमलता ताई पारवे यांच्यासह २१ नगरसेवकांचा सत्कार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांच्या उपस्थित संपन्न झाला. यावेळी आ. विजयसिंह पंडित, राष्ट्रवादी ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख अनिलदादा जगताप, सचिन मुळूक, शिवसंग्रामचे तालुकाध्यक्ष सुहास पाटील, माजी नगराध्यक्ष दिलीपराव गोरे, राजेंद्र राऊत, बळीराम गवते यांच्यासह नवनिर्वाचित नगराध्यक्षा श्रीमती प्रेमलता ताई पारवे, नवनिर्वाचित नगरसेवक फारुक पटेल, शेख निजाम, शेख मुजीब यांच्यासह नवनिर्वाचित नगरसेवक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी बोलताना अमरसिंह पंडित पुढे म्हणाले की, बीड शहरातील आजवरच्या राज्यकर्त्यांच्या अकार्यक्षम व्यवस्थेचा लोकांना विट आला होता, जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांनी बीड जिल्ह्याचा कायापालट करू हा विश्वास लोकांना दिला होता या विश्वासावरच बीड शहरातील नागरीकांनी या नव्या दमाच्या लोकांना निवडून दिले आहे. पिण्याचे पाणी, रस्ते आणि स्वच्छता या मुलभूत सुखसूविधा यापुढील काळात कमी पडू दिल्या जाणार नाहीत. निवडून आलेल्या नगरसेवकांच्या प्रभागात ज्या पध्दतीचे विकास कामे होतील त्याच पध्दतीची विकास कामे पराभूत नगरसेवकांच्या प्रभागातही केले जातील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. याप्रसंगी बोलताना अनिलदादा जगताप म्हणाले की, लोकांनी विश्वासाने आपल्याला निवडून दिलेले आहे. यापुढील काळात चांगल्या पध्दतीचे काम करून वचने पूर्ण करू असेही ते यावेळी म्हणाले. नियोजनबध्द प्रचार यंत्रणा राबविल्यामुळे आपल्याला हे घवघवीत यश मिळालेले आहे. अहंकारी व्यक्तिमत्वाला आपण त्यांची जागा दाखवून दिली असून बारामतीच्या धरतीवर बीड जिल्ह्याचा कायापालट करण्यासाठी आपण सर्व मिळून काम करू असे राष्ट्रवादी ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे म्हणाले. आपल्या प्रास्ताविकपर भाषणात राष्ट्रवादीचे माध्यम प्रमुख भागवत तावरे म्हणाले की, बीड नगर परिषद निवडणुकीचा निकाल ही नव्या राजकारणाची नांदी आहे, शिवछत्र परिवाराच्या नेतृत्वावर लोकांनी टाकलेला विश्वास आपल्याला सार्थ करायचा आहे असेही ते यावेळी म्हणाले.

सामान्य लोकांच्या मतांचा आदर करत मुलभूत सुविधा आणि सुरक्षा देणार–आ.पंडित

बीड नगर परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस व मित्र पक्षाच्या महायुतीला बीडकरांनी आश्वासक आणि अपेक्षित प्रतिसाद दिला आहे. हा विजय पालकमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या विकासाभिमुख कारभार आणि राष्ट्रवादी आणि मित्र पक्षाच्या कार्यकर्त्यांचा आहे. बीडकरांनी विकासाच्या भुमिकेवर विश्वास ठेऊन युतीला दिलेला हा जनाधार आहे. प्रचाराच्या दरम्यान सामान्य लोकांनी नागरी सुविधा संदर्भात विविध मागण्या केल्या. त्यावर आम्ही येणाऱ्या काळात काम करणार असून सामान्य लोकांच्या मतांचा आदर करत मुलभूत सुविधा आणि सुरक्षा आम्ही देऊ. मागील काळात लोकांना वेठीस धरण्याचे काम प्रस्थापितांकडून केले जात होते. नगर परिषदेच्या सत्तेच्या माध्यमातून लोकांची अडवणुक केली जात होती. त्याला आता पूर्णविराम मिळाला असून येणाऱ्या काळात लोकांची कसलीही अडवणुक यापुढे होणार नाही असा विश्वास आ. विजयसिंह पंडित यांनी व्यक्त केला. नगर परिषद निवडणुकीच्या विजयानंतर पत्रकारांशी संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी नवनिर्वाचित नगराध्यक्षा श्रीमती प्रेमलता ताई पारवे यांच्यासह नवनिर्वाचित नगरसेवक, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख अनिलदादा जगताप, राष्ट्रवादी ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे, शिवसंग्रामचे तालुकाध्यक्ष सुहास पाटील, माजी नगराध्यक्ष दिलीपराव गोरे, राजेंद्र राऊत, बळीराम गवते यांच्यासह नवनिर्वाचित नगरसेवक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

दैनिक
राज्य लोकतंत्र
मंगळवार दि.२३ डिसेंबर २०२५ | ६

शेतकऱ्यांची पत वाढली की देशाची प्रगती होईल-आ.सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील कडा येथील कृषी उत्पन्न बाजार समिती ही शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणारी सहकारी संस्था असून येथून उत्पादित होणारा कांदा थेट परदेशात निर्यात होतो. कांदा उत्पादनामुळे शेतकऱ्यांची आर्थिक क्षमता वाढली असून तालुक्याच्या कृषी अर्थव्यवस्थेत कडा बाजार समितीचा मोलाचा वाटा आहे, असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले.धामणगाव येथे कृषी उत्पन्न बाजार समिती कडा यांच्या उपबाजार पेठेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आमदार धस यांनी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या माध्यमातून कडा बाजार समिती आवारात पाच कोटी रुपयांचे अंतर्गत सिमेंट रस्ते मंजूर करण्यात येणार असल्याची घोषणा केली.

या उद्घाटन कार्यक्रमास माजी आमदार साहेबराव दरेकर, सभापती रमजान तांबोळी, उपसभापती नामदेव धोंडे, सचिव हनुमंत गळगटे, दूध संघाचे माजी चेअरमन संजय गाढवे, धामणगावच्या सरपंच संजनाताई गाढवे, सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे, एन. टी.गर्जे,संजय गाढवे,सरपंच मनोज गाढवे,चेअरमन वशांतीलाल भोसले, अशोक गर्जे, सभापती बद्रीनाथ जगताप,मा. सभापती शत्रुघन मरकड, संदीप खकाळ, शाम तळेकर आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. धामणगाव येथे उपबाजार पेठ सुरू व्हावी, ही मागणी गेल्या वीस वर्षांपासून प्रलंबित होती. आमदार सुरेश धस व बाजार समितीच्या संचालक मंडळाच्या

प्रयत्नातून हा प्रश्न अखेर मार्गी लागल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार धस पुढे म्हणाले की, धामणगाव येथे उपबाजार पेठ सुरू झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांची मोठी सोय झाली आहे. आष्टी तालुका कांदा उत्पादक म्हणून ओळखला जातो. पूर्वी येथील कांदा अहिल्यानगरला पाठवावा लागत होता; मात्र आता स्थानिक बाजारपेठ उपलब्ध झाल्याने वाहतुकीचा खर्च वाचून शेतकऱ्यांना अधिक दर मिळत आहे. धामणगाव परिसरातील शेतकऱ्यांची अनेक वर्षांची मागणी पूर्ण होत असल्याचा आनंद त्यांनी व्यक्त केला.

या उपबाजारासाठी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल प्रशांत गोडसे यांचे आभार मानत त्यांनी सांगितले की, सध्या २४ मोठे व ६ लहान प्लॉट असलेली जागा बाजार समितीने भाडेतत्त्वावर घेतली असून भविष्यात स्वतःची जागा खरेदी करून विस्तारित बाजार समिती उभारण्याचा मानस आहे.धामणगाव ते हातोला फाटा रस्त्याचे काम तात्काळ सुरू होणार असून म्हसोबावाडी ते धामणगाव हा २८ किलोमीटरचा डांबरी रस्ता एका महिन्यात पूर्ण केला जाणार आहे. तसेच बोरडवाडी ते जाट देवळा रस्त्याचे काम मंजूर झाले असून तत्काळ सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.शेतकऱ्यांची पत वाढली तरच देशाची प्रगती होईल, असे सांगून आमदार धस यांनी कांदा लागवडीत आधुनिक तंत्रज्ञान, योग्य बियाणे, खते व औषधांचा वापर करण्याचे आवाहन केले. बाजार समितीच्या संचालकांनी गावनिहाय शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. तसेच विजेच्या समस्येवर उपाय म्हणून मुख्यमंत्री सौर ऊर्जा पंप योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना माजी आमदार साहेबराव दरेकर यांनी सांगितले की, धामणगाव परिसरात कांदा उत्पादन मोठ्या प्रमाणावर असून ◀◀ पान ३ वर

नगराध्यक्षपद जे परळीत तेच बीडमध्ये

दोन्ही ठिकाणी उमेदवार पती-पत्नीचा पराभव

बीड । प्रतिनिधी

नुकत्याच झालेल्या नगरपालिका निवडणुकीमध्ये अनेकांना विजयाचा गुलाल लागला तर अनेकांना पराभव स्वीकारावा लागला या निवडणुकीमध्ये अनेक घडामोडी घडले त्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे परळी नगरपालिका आणि बीड नगरपालिकेमध्ये योगायोगाने अध्यक्षपदाचे दोन्ही उमेदवार पडले तर नगरसेवक पदाच्या

निवडणुकीत देखील उमेदवारांच्या पती नाही पराभवाचा सामना करावा लागला.

नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये नगराध्यक्ष पदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाकडून स्मिता विष्णू वाघमारे या निवडणूक लढवत होत्या तर त्यांचे पती विष्णू वाघमारे ही प्रभाग दोन मधून उमेदवार होते निकाल लागला त्यावेळी नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार स्मिता वाघमारे यांचा देखील पराभव झाला त्यासोबतच त्यांचे पती विष्णू वाघमारे यांचा देखील प्रभाग दोन मधून मोठ्या फरकाने पराभव ◀◀ पान ३ वर

भाजपच्या 'या दोन' चेहऱ्यांची शहरभर चर्चा

बीड । प्रतिनिधी

नुकत्याच पार पडलेल्या बीड नगरपालिका निवडणुकीचा निकाल लागला नगराध्यक्षपदी राष्ट्रवादीच्या प्रेम्लथा पारवे विजय झाले मात्र भाजपाने इतिहासात पहिल्यांदाच दिलेली लढत नोंद घेण्यासारखे आहेत यातच भाजपमधून निवडून आलेल्या दोन चेहऱ्याची चर्चा निवडणुकीतही आणि निवडणुकीनंतरही होत आहे ते चेहरे म्हणजे शुभम धूत आणि सय्यद मुस्तफा.

नगरपालिका निवडणुकीमध्ये सर्वच पक्षांनी ताकद लावली होती पहिल्यांदाच भाजपाने बीड नगरपालिकेत मोठे यश संपादन केले नगराध्यक्ष पदाला हुलकावणी मिळाली असली तरी १५ च्या आसपास नगरसेवक पहिल्यांदाच भाजपचे म्हणून नगरपालिकेत

प्रवेश करत आहेत त्यातही प्रभाग क्रमांक दोन मधून शुभम दूध आणि प्रभाग १३ मधून सय्यद मुस्तफा यांची चर्चा मात्र जोरदार सुरू आहे प्रभाग दोन मध्ये शुभम धूत यांनी मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला विशेष म्हणजे त्यांच्या विरोधात नगराध्यक्ष पदासाठी असलेल्या उमेदवार स्मिता वाघमारे यांची पती विष्णू वाघमारे होते परंतु शुभम धूत यांना मतदारांनी स्वीकारले आणि मोठ्या मताधिक्याने त्यांचा विजय झाला यापूर्वी देखील ते नगरपालिकेमध्ये नगरसेवक म्हणून कार्यरत होते परंतु विष्णू वाघमारे यांचा तगडा अनुभव वाघमारे यांनाच कामी आला नाही दुसरीकडे मुस्लिम समाज भाजप विरोधी आहे ही जी चर्चा होती त्याला तिलांजली देण्याचे काम प्रभाग क्रमांक १३ मधून सय्यद मुस्तफा यांनी केले आहे एक मुस्लिम भाजपाचा नगरसेवक म्हणून बीडमध्ये त्यांची नोंद झाली आणि त्यांचीच चर्चा सर्वाधिक होत आहे सय्यद मुस्तफा हे मागील काळात देखील नगरसेवक होते परंतु आता भाजपाचे नगरसेवक असल्याने त्यांची चर्चा अधिक होत आहे त्यातही शुभम धूत यांनी मातब्बर असलेल्या उमेदवाराला पराभूत करून मोठ्या मताधिक्याने विजय मिळवला याची देखील मोठी चर्चा होत आहे

जागतिक सहकार वर्षानिमित्त तुळजाभवानी अर्बनच्या उत्कृष्ट सहकार कार्याचा गौरव

माजलगाव । प्रतिनिधी

येथील तुळजाभवानी अर्बनसाठी कालचा दिवस कौतुकाची एक थाप देणारा ठरला.महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी पुणे येथे, जागतिक सहकार वर्षानिमित्त सहकार क्षेत्रातील अनुभव, व आव्हाने यावर विचारमंथन घडवून आणण्यासाठी ग्रीन वर्ल्ड व कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँक लि.यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहकार मंथन २०२५' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या प्रसंगी ठेवीदारांच्या

हिताचे रक्षण,पारदर्शक व उत्तरदायी व्यवस्थापन आणि सहकार तत्त्वांचे उत्कृष्ट पालन याची दखल घेत तुळजाभवानी अर्बनचा ग्रीन वर्ल्ड को प्राइड पुरस्काराने गौरव करण्यात आला.यावेळी महाराष्ट्र राज्याचे सहकार आयुक्त दीपक तावरे, बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे अध्यक्ष मिलिंद काळे,ग्रीन वर्ल्डचे अध्यक्ष गौतम कोतवाल यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना उपमुख्य ◀◀ पान ३ वर

जवळगाव खून प्रकरणी मुख्य आरोपी अटकेत

स्थानिक गुन्हे शाखेने लावला खून प्रकरणाचा छडा

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात आढळलेल्या एका अनोळखी प्रेताची ओळख पटवून अवघ्या दोन दिवसांत खुनाचा गुन्हा उघडकीस आणत स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांनी कामगिरी केली आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपीला जेरबंद करण्यात पोलिसांना यश आले आहे.

दिनांक १८/१२/२०२५ रोजी बर्दापूर पोलीस स्टेशन हद्दीतील

जवळगाव ता. अंबाजोगाई शिवारातील मंचक पंढरी डवारे यांचे गायरान शेतात एक अनोळखी पुरुषाचे प्रेत पालथे स्थितीत आढळून आले. त्यावरून पोलीस स्टेशन बर्दापूर याने सदर घटनेमध्ये पंचनामा करून संबंधीत पुरुषाचे प्रेत शव विच्छेदन करिता सरकारी दवाखाना अंबाजोगाई येथे नेण्यात आले. शवविच्छेदन झालयानंतर वैद्यकीय अधिकारी यांनी दिलेल्या शवविच्छेदनाचे अहवालावरून सदर मयताचा मृत्यू हा त्याला झालेल्या मारहाणीमुळे झालेला आहे असे निष्पन्न झाले. त्यावरून बर्दापूर पोलीस स्टेशन गु.र.नं. २९९/२०२५ कलम १०३ (१) भा.न्या.सं. प्रमाणे अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा दाखल झाला.गुन्हा दाखल झाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने तपासाची सूत्रे हाती घेतली. घटनास्थळावरील पुरावे, तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज, तसेच गोपनीय माहितीच्या आधारे तपास वेगाने पुढे नेण्यात आला.सखोल चौकशीत मृत व्यक्तीची ओळख पटवण्यात पोलिसांना यश आले. त्यानंतर आरोपीचा ◀◀ पान ३ वर

नामस्मरणाने पाप नाश होतो -ह.भ.प. नवनाथ महाराज

बीड । प्रतिनिधी

श्री शनी मंदिर देवस्थान आयोजित कीर्तन महोत्सवाचा शुभारंभ अत्यंत भावविभूत, भक्तिरसाने ओथंबलेल्या वातावरणात झाला. या महोत्सवातील पहिले कीर्तन पुष्प ह.भ.प. नवनाथ महाराज, जरुड यांचे अत्यंत प्रभावी व अंतःकरणाला स्पर्श करणाऱ्या शैलीत संपन्न झाले. त्यांच्या ओजस्वी वाणीने आणि भक्तीने भारलेल्या निरूपणाने संपूर्ण मंदिर परिसर जणू नामस्मरणाने गहिवरून गेला.

या प्रसंगी नवनाथ महाराजांनी जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या

''तुटे भवरोग । संचितक्रियमाणभोग ।।

ऐसें विठोबाचें नाम । उच्चारितां खंडे जन्म ।।

वसों न सके पाप । जाय त्रिविध तो ताप ।।

तुका म्हणे माया । होय दासी लागे पाया ।।''

या अमृततुल्य अभंगांचे हृदयस्पर्शी निरूपण केले. विठ्ठलनामाच्या उच्चाराने जन्मोजन्मीचे बंधन तुटते, पापांचा अंधार दूर होतो आणि भक्ताच्या जीवनात शांती, समाधान व आनंद नांदतोहा गूढ भक्तिमार्ग त्यांनी भावपूर्ण शब्दांत उलगडून सांगितला. प्रत्येक ओवीसोबत भाविकांची मने हेलावली, अनेक डोळे पाणावले आणि अंतःकरण भक्तीने भारून गेले.

कीर्तनसेवेसाठी संतोष महाराज डोंगरे, धर्मभूषण रामनाथ खोड, शिंदे महाराज, वैभव महाराज काकडे, तेजस मते महाराज तसेच बंकटस्वामी संस्थानचे टाळकरी विद्यार्थी यांनी टाळ-मृदंगाच्या गजरात भक्तिरसाची अखंड धार वाहती ठेवली. ''विठ्ठल विठ्ठल'', ''ज्ञानोबा-तुकाराम'' च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. मोठ्या संख्येने उपस्थित भाविकांनी या दिव्य कीर्तनाचा लाभ घेत श्री शनी महाराजांच्या चरणी कृतज्ञ भावाने नतमस्तक होत आध्यात्मिक आनंदाचा अनुभव घेतला.

धर्माधिकारी पति-पत्नी ठरले सर्वात तरुण नगराध्यक्ष दांम्पत्य!

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी वैजनाथ नगरपरिषद निवडणुकीच्या इतिहासात अनेक अधोरेखित करणाऱ्या उल्लेखनीय बाबी आहेत. याच अनुषंगाने एक वैशिष्ट्यपूर्ण निवडणूक म्हणून यावेळच्या निवडणुकीकडे बघितले जात आहे. जनतेतून नगराध्यक्षा म्हणून काम करण्याची संधी मिळालेल्या सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांनी आपर्यंतच्या सर्वात तरुण महिला नगराध्यक्षा म्हणून इतिहास रचला आहे. त्याचबरोबर बाजीराव धर्माधिकारी व सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी हे दांपत्यही परळीच्या नगरपालिकेच्या इतिहासात नगराध्यक्ष पद भूषविणारे सर्वात तरुण दांपत्य ठरले आहे.

परळी वैजनाथ नगर परिषदेचे नगराध्यक्ष पद भूषविणारे बाजीराव मैय धर्माधिकारी हे सन २०१४ ते २०१७ या कालावधीत सर्वात तरुण व यशस्वी नगराध्यक्ष म्हणून परळीत सर्व परिचित झाले. वयाच्या अवघ्या ३२ व्या वर्षी नगराध्यक्ष झालेले मराठवाड्यातील सर्वात तरुण नगराध्यक्ष म्हणून त्यांनी इतिहास रचला होता. नगराध्यक्ष पदाची संधी मिळाल्यानंतर त्यांनी ही धुरा यशस्वीपणे सांभाळली. योगायोगाने नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या यंदाच्या निवडणुकीत त्यांच्या सुविधे पत्नी सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनाही थेट जनतेतून निवडून येऊन नगराध्यक्षपदी विराजमान होण्याची संधी मिळाली आहे. महिला नगराध्यक्षांच्या प्रभावळीत सर्वात तरुण, उच्चशिक्षित व सर्वाधिक मताधिक्याने नगराध्यक्षपदी विराजमान होणाऱ्या नगराध्यक्षा त्या ठरल्या आहेत. त्याशिवाय या निवडणुकीत एक वेगळा इतिहासही रचला गेल्याचे बघायला मिळाला आहे. नवनिर्वाचित नगराध्यक्षा पद्मश्री धर्माधिकारी यांचे पती बाजीराव धर्माधिकारी यांनीही नगराध्यक्ष पद भूषवलेले आहे. नगराध्यक्षपदावर पती-पत्नी दोघेही विराजमान होणारे आत्तापर्यंतचे हे सर्वात तरुण दाम्पत्य ठरले आहे हेही या निवडणुकीचे वैशिष्ट्य ठरले आहे.

विकासासाठी अधिकाऱ्यांनी स्वयंप्रेरणेने काम करावे -संचालक सुमन चंद्रा

बीड । प्रतिनिधी

आकांक्षित तालुका अंतर्गत वडवणी मधील प्रगती चांगले आहे. यापुढील काळातही यापेक्षा अधिक गतीने काम करून विशेषत्वाने महिलांचे जीवनमान उंचवावे जेणेकरून येथील बालविवाहाचे प्रमाण कमी होऊ शकते. कोणी येऊन काम करेल याची वाट न बघता सर्व अधिकाऱ्यांनी हे आपलेच काम समजून स्वयं प्रेरणेने काम करण्याची गरज आहे. हो सर्वांनी करावे असे आवाहन नवीन आणि नवीनिकरणीय ऊर्जा मंत्रालयाच्या संचालक सुमन चंद्रा यांनी आज येथे केले.

आकांक्षित तालुका विकास कामाचा आढावा आज एका बैठकीत घेण्यात आला. त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान तसेच अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक,

आकांक्षित तालुका वडवणी बाबत आढावा बैठक

जिल्हा नियोजन अधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांची प्रमुख उपस्थित होती.

देशात ५०० ब्लॉक मधील तालुक्यामध्ये हा आकांक्षित तालुका कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत मागासलेल्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे उद्दिष्ट केंद्र शासनाने ठेवलेले आहे. यामध्ये वडवणी तालुका देशात ११७ व्या क्रमांकावर असून चार झोन अंतर्गत ६९ ब्लॉक मध्ये बारावा आणि राज्यात वडवणी तालुका कामाच्या बाबतीत प्रथम क्रमांकावर आहे. या आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत आरोग्य, पोषण, शिक्षण, कृषी, सामाजिक विकास आणि पायाभूत सुविधा या सात मुद्द्यावर आधारित उद्दिष्टे ठरवून विकास करावयाचा आहे. बीडमध्ये बदल घडत आहे याचा संदेश दिला गेला पाहिजे. या ठिकाणी असणाऱ्या बालविवाह समस्येचे मूळ विविध कारणांमध्ये आहे. त्यामुळे मुलींचे शिक्षण त्यांचे समाजातील स्थान आणि त्यांच्या कार्याचे मोल या मुद्द्यांवर लक्ष दिले गेले पाहिजे असे सुमन चंद्रा यावेळी म्हणाल्या. समस्येचा शोध घेतला आहे त्याची योग्य कारणमीमांसा व त्यावर सकारात्मकपणे उपाय योजना या माध्यमातून विकास साधता येईल, असे सांगून त्या म्हणाल्या की, बालविवाहाच्या समस्येवर लक्ष केंद्रित करताना त्याला प्राधान्य दिले तर बालविवाह करण्याचे प्रमाण कमी होईल.मुलींना शिक्षणात प्राधान्य देण्याबाबत प्रसिद्धी तसेच प्रत्यक्ष यांच्यात जाणीव जागृती गरजेची आहे. कार्यक्रमांतर्गत बचत गटांना केवळ मर्यादित भूमिकेत न ठेवता त्यांना उद्योग प्रशिक्षण आणि त्यांच्या ◀◀ पान ३ वर

ॲट्रॉसिटी कायद्यातील खून-मृत्यू प्रकरणांतील वारसांसाठी शासकीय नोकरीची संधी

बीड । प्रतिनिधी

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम, १९८९ (ॲट्रॉसिटी ॲक्ट) अंतर्गत दाखल खून अथवा अत्याचारामुळे झालेल्या मृत्यू प्रकरणांतील दिवंगत व्यक्तींच्या वारसांना शासकीय व निमशासकीय नोकरी देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या अनुषंगाने पात्र वारसांनी अर्ज सादर करावेत, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, बीड यांनी केले आहे.

अनुसूचित जाती-जमातींवरील जातीआधारित अत्याचार रोखण्यासाठी केंद्र शासनाने ॲट्रॉसिटी ॲक्ट लागू केला आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक २० नोव्हेंबर २०१५ च्या शासन निर्णयानुसार, या कायद्यांतर्गत दाखल खून किंवा अत्याचारामुळे मृत्यू झालेल्या प्रकरणांत दिवंगत व्यक्तीच्या एका वारसास शासकीय अथवा निमशासकीय नोकरी देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

ही योजना कायदा लागू झाल्यापासून म्हणजेच ३० ऑगस्ट १९९० ते ३१ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत दाखल झालेल्या खून किंवा मृत्यू प्रकरणांसाठी लागू राहणार आहे. या कालावधीत पात्र ठरणाऱ्या वारसांनी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावेत. अर्ज सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, बीड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शासकीय विश्रामगृहासमोर, नगर रोड, बीड या कार्यालयात तात्काळ सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी या कार्यालयाशी थेट संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
मंगळवार दि.२३ डिसेंबर २०२५ । पान ७

नगरपालिका निकाल म्हणजे मोदी-फडणवीस डबल इंजिन सरकारवरील विश्वास -मोहोळ

पुणे । प्रतिनिधी

नुकत्याच जाहीर झालेल्या नगरपालिका निवडणुकांच्या निकालात भारतीय जनता पक्षाला मिळालेले अभूतपूर्व यश हे केंद्रातील पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यातील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या डबल इंजिन सरकारवर मतदारांनी दाखवलेला विश्वास असल्याची प्रतिक्रिया पुण्याचे खासदार आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी 'पुढारी'शी बोलताना व्यक्त केली. महाराष्ट्राच्या मतदारांनी भाजपचे सर्वाधिक नगरसेवक आणि सर्वाधिक नगराध्यक्ष निवडून दिले. डबल इंजिनला पाठबळ दिले तर आपला विकास चांगल्या पद्धतीने होत राहील, हाच भरवसा महाराष्ट्राच्या मतदारांनी व्यक्त केला आहे. पुणे महानगरपालिका निवडणुकीत देखील मतदारांची साथ 'नरेंद्र-देवेंद्र' या विकासाभिमुख नेतृत्त्वालाच मिळणार असल्याचे या निकालातून स्पष्ट होते, असे मोहोळ म्हणाले.

एकूण २८८ नगरपालिकांपैकी सव्वाशेहून अधिक ठिकाणी भाजपचे नगराध्यक्ष नागरिकांनी निवडून दिले. भाजपच्या कमळ चिन्हावर निवडून आलेल्या नगरसेवकांची संख्या राज्यात सर्वाधिक म्हणजे सुमारे सव्वातीन हजार इतकी मोठी आहे. विरोधातील काँग्रेस, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) या तिन्ही पक्षांच्या एकत्रित नगराध्यक्ष व नगरसेवकांची संख्या भाजपपेक्षा कैक पटीने कमी आहे. नगरपालिकांच्या निकालात भाजपला संपूर्ण राज्यात प्रचंड यश मिळाले. राज्याच्या सर्वच भागातील शहरी व ग्रामीण मतदारांनी भाजपला भरभरून मतदान केले. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या सरकारने महाराष्ट्रात नुकताच एक वर्षाचा कार्यकाळ पूर्ण केला. या पहिल्या वर्षातच राज्य सरकारने कल्याणकारी योजना आणि पायाभूत सुविधांचा विकास याचे संतुलन चांगल्या प्रकारे राखले.

केंद्रातील मोदी सरकारची राज्यात कोट्यवधी रुपयांची विकासकामे सुरू आहेत. त्यामुळे नरेंद्र-देवेंद्र यांचेच नेतृत्व जनहिताचे असल्याची प्रतिक्रिया मतदारांनी मतदानाद्वारे व्यक्त केल्याचे नगरपालिका निकालावरून स्पष्ट दिसते. याउलट प्रमुख विरोधी पक्षांनी आपली विश्वासार्हता पूर्णतः गमावली आहे. मनसेला तर मतदारांनी अजिबातच संधी दिली नाही. विधानसभेतील दारूण पराभवानंतरही विरोधी पक्ष जनतेत जाण्याऐवजी जनहिताशी संबंधित नसलेल्या मुद्यांवरून भम पसरवण्याचा प्रयत्न करत राहिला. सत्तेत आल्यानंतर विकासासाठी निधी कुठून आणणार, याचे उत्तर विरोधक जनतेला देऊ शकले नाहीत. त्यामुळे जनतेने विरोधी पक्षांना सपशेल नाकारले, असे राजकीय विश्लेषक सांगतात.

बिबट्याला जेरबंद करण्यात वनविभागाला यश; नागरिकांना काहीसा दिलासा

शिरूर । प्रतिनिधी

चांडोह (ता. शिरूर) येथील शेतकरी हर्षल भुजबळ यांच्या शेतात लावलेल्या पिंजऱ्यात रविवारी (दि. २१) रोजी पहाटेच्या सुमारास बिबट्याला जेरबंद करण्यात वनविभागाला यश आले. सहा वर्षे वयाची ही बिबट मादी संवर्गातील असून तीला पुढील उपचार व निरीक्षणासाठी माणिकडोह येथील बिबट निवारा केंद्रात हलविण्यात आले असल्याचे वनरक्षक लहू केसकर यांनी सांगितले.

गेल्या अनेक दिवसांपासून पिंपरखेड, जांबुत, चांडोह व फाकटे परिसरात बिबट्याचा मुक्त संचार वाढल्याने शेतकरी व



ग्रामस्थ भयभीत झालेले आहेत. या परिसरातून दोन महिन्यात सुमारे २५ बिबटे वनविभागाने जेरबंद केले असले तरीही दिवसाढवळ्या शेतात काम करताना शेतकऱ्यांना बिबटचाचे वारंवार दर्शन होत असल्याने नागरिकांमध्ये दहशत निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या मागणीनुसार व शासनाच्या आदेशानुसार वनविभागाने परिसरात पिंजरे लावण्याची मोहीम हाती घेतली आहे. या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांनी काहीसा दिलासा मिळाला असला तरी देखील भविष्यातील धोका टाळण्यासाठी वनविभागाने अधिकाधिक पिंजरे लावून बिबट्यांना जेरबंद करावे व बिबट प्रवण क्षेत्र असलेला परिसर बिबटमुक्त करावा, अशी मागणी परिसरातील ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

पुस्तक महोत्सवात 'त्या' एका शपथेने मोडला जागतिक विक्रम

पुणे । प्रतिनिधी

पुणे पुस्तक महोत्सवाचा रविवारी अभूतपूर्व उत्साहात समारोप झाला. महोत्सवाच्या शेवटच्या दिवशी तिसरा विश्वविक्रम प्रस्थापित करून पुणेकरांनी वाचन संस्कृतीसोबतच पर्यावरण संवर्धनाचा नवा आदर्श जगासमोर ठेवला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडलेल्या पंचप्रण संकल्पनेला अनुसरून हजारो नागरिकांनी वसुंधरा संरक्षणाची शपथ घेतली आणि या उपक्रमाची अधिकृत नोंद गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये करण्यात आली.

राष्ट्रीय पुस्तक न्यासाच्या (एनबीटी) वतीने फर्गसन महाविद्यालयाच्या मैदानावर

गेल्या नऊ दिवसांपासून हा महोत्सव सुरू होता. समारोपवेळी महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे यांनी तिसऱ्या विश्वविक्रमाची माहिती दिली. लार्जेस्ट ऑनलाईन व्हिडिओ अल्बम ऑफ पीपल रीसायटिंग ओथ/प्लेज असे या विक्रमाचे नाव आहे. केवळ चार दिवसांच्या कालावधीत २७ हजार १४० नागरिकांनी वसुंधरा संरक्षणाची शपथ घेणारे व्हिडिओ ऑनलाइन अपलोड केले होते. तांत्रिक तपासणीनंतर गिनीज वर्ल्ड रेकॉर्डने २१ हजार ४९८ व्हिडिओ वैध ठरवून नवा विक्रम घोषित केला. यापूर्वीचा विक्रम ११ हजार २५१ व्हिडिओंचा होता, जो पुणेकरांनी मोठ्या फरकाने मोडीत काढला. समारोपाला ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. राजेंद्र शेंडे, कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे, एनबीटीचे अध्यक्ष मिलिंद मराठे, संचालक युवराज मलिक, अभिनेते प्रवीण तरडे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. लाखो नागरिकांची उपस्थिती आणि विक्रमी पुस्तक खरेदीमुळे हा महोत्सव पुणेकरांच्या हक्काचे व्यासपीठ बनला आहे. सांस्कृतिक कार्यक्रमांना लाभलेली गर्दी आणि युवा पिढीचा वाढता सहभाग हे महोत्सवाचे सर्वात मोठे यश ठरले आहे. या तीन विश्वविक्रमांमुळे पुणे पुस्तक महोत्सवाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, वाचन चळवळीला यामुळे नवी दिशा मिळाली आहे, अशी माहिती राजेश पांडे यांनी दिली.

नाना अन् बापू समोरासमोर लढले तर काटे की टक्कर

पुणे । प्रतिनिधी

पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये राजकारणातील जुळवाजवळ हे सूत्र सर्वच पक्षांमध्ये चालते त्याचा प्रत्यय या ठिकाणी येतो मात्र यावेळी नाना काटे आणि बापू काटे दोघे एकमेकाविरुद्ध लढले तर काटे की टक्कर पहावयास मिळेल परंतु ते एकमेका विरुद्ध लढतात की नाही हे पाहणे गरजेचे आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे हे दरवेळेला भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न उर्फ बापू काटे यांच्याशी हात मिळवणी करून समोरासमोर निवडणूक लढविण्याचे टाळतात व दुसऱ्या उमेदवारांचे बळी देतात.त्यामुळे यावेळी तरी नाना काटे व बापू काटे एकमेकांसमोर निवडणूक लढवण्याची हिंमत दाखवणार का?

पिंपळे सौदागर रहाटणी अशा

या प्रभाग २८ मधून नाना काटे व बापू काटे हे दरवेळेला निवडणूक लढवतात.मात्र नाना काटे हे सर्वसाधारण गटातून निवडणूक लढवतात व बापू काटे मागास प्रवर्गातून (ओबीसीतून) निवडणूक लढवतात.त्यामुळे ते समोरासमोर येण्याचे टाळतात.त्या दोघांची एक प्रकारे छुपी युती असते अशी चर्चा प्रभागातील नागरिक करतात.

२००७ च्या महापालिका निवडणुकीत नाना काटे हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार होते व शत्रुघ्न बापू काटे हे काँग्रेस पक्षाचे उमेदवार होते.त्यावेळी सिंगल वॉर्ड होता त्यामुळे त्या दोघांकडे पर्याय नव्हता.मात्र त्यावेळी काँग्रेस ही संपण्याच्या स्थितीत होती म्हणून नाना काटे हे त्या निवडणुकीत विजयी झाले व बापू काटे यांचा पराभव झाला.मात्र आता बापू काटे हे भाजपचे उमेदवार आहेत आणि पिंपळे सौदागर व रहाटणीचा काही भाग हा मोठमोठ्या सोसायट्यांचा प्रभाग आहे. त्यामुळे यावेळेस बापू काटे यांचे पारडे जड आहे.कारण सोसायटी परिसरात कमळ जास्त प्रमाणात चालते आणि बापू काटे यांच्याकडे आज कमळ आहे.

मराठा समाज हा मुळ चा कुणबी शेतकरी असल्याने बहुतेक मराठा समाजाच्या उमेदवारांकडे कुणबीचे दाखले आहेत व बापू काटे हे कुणबी दाखल्यावर मागास वर्गातून म्हणजेच ओबीसीतून दर वेळेला नगरसेवक म्हणून निवडणूक लढवतात.नाना काटे व बापू काटे समोरासमोर येऊ नये म्हणून नाना काटे कुणबी दाखला काढत नाहीत व समोरासमोर निवडणूक लढवण्याचे टाळतात.

मात्र आता पक्ष श्रेष्ठीने सांगितले तर बापू काटे हे नाना काटे यांच्यासमोर सर्वसाधारण गटातून निवडणूक लढू शकतात व आपल्या २००७ च्या पराभवाचा वचपा काढू शकतात.पिंपळे सौदागर रहाटणी या प्रभागातून यावेळी तरी नाना काटे आणि बापू काटे समोरासमोर लढण्याची हिंमत दाखवणार का ? हे येणारा काळच सांगू शकेल अशी चर्चा शहरात रंगलेली पहायला मिळतेय.

विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातच अधिकाधिक ज्ञान आत्मसात करावे – पोलीस आयुक्त अमितेश

पुणे । प्रतिनिधी

भारतीय भाषा, विज्ञान, तंत्रज्ञान,आरोग्य, क्रीडा याबरोबरच भारतीय ज्ञान परंपरा यांचा अभ्यास विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातच आत्मसात केला पाहिजे. त्यातूनच आपली वैभवशाली संस्कृती व परंपरा जपली जाईल, असा मोलाचा सल्ला पुण्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी विद्यार्थ्यांना दिला.

पुण्यातील शिवाजीनगर परिसरातील प्रियदर्शनी पुणे पोलीस पब्लिक स्कूलतर्फे आयोजित रूटस् अँड विंगज या वार्षिक शैक्षणिक प्रदर्शनाचे उद्घाटन अमितेश कुमार यांच्या हस्ते झाले. यावेळी शिवाजीनगर पोलीस मुख्यालयाचे पोलीस उपायुक्त डॉ. सागर कवडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश बोळकोटगी, पोलीस कल्याण विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राघवेंद्रसिंह क्षीरसागर, प्रियदर्शनी

व्यवस्थापनाच्या संस्थापक सचिव तरूणा सिंह, प्रियदर्शनी ग्रुप ऑफ स्कूलचे व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. राजेंद्र सिंह, पूजा सिंह, डॉ. जितेंद्र सिंह, शाळेच्या प्राचार्या अर्पिता दीक्षित यांच्यासह पोलीस विभागातील अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मराठी भाषेच्या उगमपासूनचा प्रवास, भारतीय शिक्षण पद्धती आणि इंग्रजांकडून दिले जाणारे शिक्षण, शिक्षणासाठी स्थापन करण्यात आलेले वेगवेगळे आयोग, शिक्षणात मातृभाषेला देण्यात आलेले प्राधान्य अशा प्रदर्शनातील विविध प्रकल्पांना भेट देवून अमितेश कुमार यांनी विद्यार्थ्यांशी संवादही साधला. हिंदी, इंग्रजी यासह विज्ञान, तंत्रज्ञान, रोबोटिक्स, स्पोर्ट आदी विषयांवरील प्रकल्पांची त्यांनी पाहणी केली. प्रदर्शनातून दिसणारी विद्यार्थ्यांमधील बुद्धीमत्ता, सर्जनशीलता आणि कलात्मकता यांचा सुरेख संगम पाहून त्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. प्रयोगातून शिक्षण कसे घ्यावे, अशी प्रकल्पाची मांडणी केल्याबद्दल डॉ. राजेंद्र सिंह यांनी विद्यार्थ्यांचे व प्रदर्शनासाठी परिश्रम घेतलेल्या सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. शाळेच्या सर्व पालकांनी प्रदर्शन पाहण्याचा आनंदही लुटला.

कात्रज, मांजरी भागातील सदनिकांवर चोरट्यांचा डल्ला

पुणे । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून घरफोडी करणाऱ्या चोरट्यांनी शहरात धुडघूस घातला असून, कात्रज, मांजरी भागातील सदनिकेचे कुलूप तोडून चोरट्यांनी सहा लाख ६१ हजार रुपयांचा ऐवज चोरी केला आहे. याप्रकरणी भारती विद्यापीठ आणि मांजरी पोलिस ठाण्यात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कात्रज भागातील निंबाळकरवाडी परिसरातील सदनिकेचे कुलूप तोडून चोरट्यांनी एक लाख १४ हजार रुपयांचा ऐवज लांबविला. याबाबत एकाने भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हे निंबाळकरवाडी भागातील ऑरा नेस्ट सोसायटीत राहायला आहेत. चोरट्यांनी २० डिसेंबर रोजी सदनिकेचे कुलूप तोडून चोरट्यांनी शहरात धुडघूस घातला असून, कात्रज, मांजरी भागातील सदनिकेचे कुलूप तोडून चोरट्यांनी सहा लाख ६१ हजार रुपयांचा ऐवज चोरी केला आहे. याप्रकरणी भारती विद्यापीठ आणि मांजरी पोलिस ठाण्यात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कात्रज भागातील निंबाळकरवाडी परिसरातील सदनिकेचे कुलूप तोडून चोरट्यांनी एक लाख १४ हजार रुपयांचा ऐवज लांबविला. याबाबत एकाने भारती विद्यापीठ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हे निंबाळकरवाडी भागातील ऑरा नेस्ट सोसायटीत राहायला आहेत. चोरट्यांनी २० डिसेंबर रोजी सदनिकेचे कुलूप तोडून कपाटातील दागिने, रोकड असा एक लाख १४ हजार रुपयांचा ऐवज लांबविला. पोलिस उपनिरीक्षक नीलेश मोकाशी तपास करत आहेत. हडपसरमधील मांजरी बुद्रुक भागात सदनिकेचे कुलूप तोडून चोरट्यांनी पाच लाख ५७ हजार रुपयांचे दागिने लांबविले. याबाबत एका महिलेने मांजरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी महिला मांजरीतील माऊली रेसीडन्सी सोसायटीत राहायला आहेत. १० डिसेंबर रोजी त्या परगावी गेल्या होत्या. चोरट्यांनी सदनिकेचे कुलूप तोडून ऐवज लांबविला. १८ डिसेंबर रोजी त्या गावाहून परतल्या. तेव्हा घरफोडीचा प्रकार उघडकीस आला. पोलिस उपनिरीक्षक महेश कवळे तपास करत आहेत.

पगार असला तरी राहणीमानासाठी पोटगी आवश्यक; पुणे न्यायालयाचा डॉक्टर पत्नीच्या बाजूने निकाल

पुणे । प्रतिनिधी

पती आणि पत्नी यांच्या उत्पन्नामध्ये असणारी तफावत, पत्नीला शिक्षणाप्रमाणे राहणीमान ठेवण्यासाठी पोटगी देणे आवश्यक असल्याचा निष्कर्ष काढत न्यायालयाने डॉक्टर पत्नीला दरमहा १० हजार रुपये अंतरिम पोटगी देण्याचा आदेश दिला. कौटुंबिक न्यायालयाच्या न्यायाधीश शुभांगी यादव यांनी हा आदेश दिला आहे. तिने मिळकत व जबाबदारीचे पत्र दाखल केलेल्या तारखेपासून म्हणजे १७ मे पासून ही रक्कम द्यावी लागणार असल्याचेही आदेशात म्हटले आहे.

माधव आणि माधवीचा (नावे बदलली आहेत) विवाह प्रेम आणि ठरवून फेब्रुवारी २०२१ मध्ये झाला. मार्च २०२४ पासून दोघे विभक्त राहत आहेत. पत्नीने क्रुरता व त्याग या कारणाकरिता न्यायालयात घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला आहे. या निकालास कालावधी लागणार असल्याने ॲड. भारती जागडे, ॲड. अक्षय जागडे यांच्यामार्फत दरमहा पोटगीची मागणी केली. पतीला दरमहा १ लाख २५ हजार रुपये पगार आहे. हडपसर येथे १ बीएचके फ्लॅट आणि इतर ठिकाणी बरीचशी स्थावर मालमत्ता आहे. या व्यतिरिक्त पतीचे इतर उत्पन्न असल्याचेही त्याने न्यायालयात दाखल केलेल्या कागदपत्रावरून दिसून येत आहे. त्यामुळे अंतरिम पोटगी देण्याची मागणी करण्यात आली. यास माधवच्या वकिलांनी विरोध केला. ती दंत चिकित्सक आहे. तिला दरमहा २५ ते ३० हजार रुपये पगार आहे. तिच्या खात्यावर झालेल्या व्यवहारावरून पगारा व्यतिरिक्त उत्पन्न असल्याचेही दिसून येत आहे. त्याला दरमहा १ लाख २५ हजार रुपय असला, तरीही त्याचा मासिक खर्च १ लाख २४ हजार ४२० रुपये आहे.

ती विमानाने प्रवास करते. नियमितपणे गोवा, केदारनाथ, हिमाचल प्रदेश, तिबेट या ठिकाणी फिरण्यासाठी जाते. राहणीमान पाहता तिला पोटगीची गरज नसल्याचा युक्तीवाद करण्यात आला. दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकुण न्यायालयाने अंतरिम पोटगीचा निकाल दिला.

कुणासोबत युती करायची हे पवारसाहेब ठरवतील, आमचे उमेदवार 'तुतारी'वर लढतील; प्रशांत जगतापांनी पुण्याची स्ट्रॅटेजी सांगितली

पुणे । प्रतिनिदी

शरद पवार हे आमचे नेते असून महापालिका निवडणुकीसाठी कुणासोबत युती करायची याचा निर्णय तेच घेतील, आमच्या वाटचाला ज्या जागा येतील त्या तुतारी या चिन्हावरच लढवल्या जातील असं शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप (झीरोहरपीं गरसींर्‍) यांनी सांगितलं. पुण्यात आम्ही चांगली मोर्चेबांधणी केली आहे, लोकांना वेगळा पर्याय हवा आहे असंही ते म्हणाले.

राज्याचे लक्ष लागलेल्या पुणे महापालिकेसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. या निवडणुकीत पक्षाच्या तयारीची माहिती प्रशांत जगताप यांनी दिली. तसेच पुण्यात अजित पवार आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीची युती

होणार असल्याची चर्चा सुरू आहे. त्यावरही प्रशांत जगताप यांनी प्रतिक्रिया दिली. माझे नेते हे पवार साहेब आणि सुप्रिया सुळे आहेत. मी साहेबांवर विश्वास ठेऊन आलोय, मला त्यांच्याबाबत खात्री आहे. मी जाहीरनामा दिला आहे. पक्षाने कुणासोबत युती करावी हा पवारसाहेबांचा निर्णय आहे असं प्रशांत जगताप म्हणाले. प्रशांत जगताप म्हणाले की, आमच्या वाट्याला ज्या जागा येतील त्या तुतारी या चिन्हावरच लढू. त्यासाठी आम्ही महाविकास आघाडीतील राज्य स्तरावरील नेत्यांशी चर्चा केली आहे. राज्यातील काँग्रेसची ताकद दुर्लक्षित करून चालणार नाही. कोणतीही सत्ता नसताना, कोणताही स्त्रोत नसताना त्यांनी अजित पवारांच्या पक्षापेक्षाही जास्त जागा निवडून आणल्या. त्यामुळे पुण्यामध्ये जे लढून जिंकू शकतात ते सगळे महाविकास आघाडी म्हणून कसे एकत्र येऊ शकतात यावर विचार सुरू आहे.प्रशांत जगताप म्हणाले की, आमच्या महाविकास आघाडी म्हणूनच बैठका झाल्या आहेत. महायुतीमध्ये कुणाला घ्यायचं, कुणासोबत आघाडी करायची याबाबतचा निर्णय शरद पवार घेतली. अजितदादा काय निर्णय घेतील ते माहिती नाही, पण आमच्यासाठी शरद पवार काय आदेश देतात ते महत्त्वाचं. पुण्यातील जागावाटपाची चर्चा झाली आहे. महाविकास आघाडीतील वरिष्ठ नेत्यांनी त्यावर चर्चा केली आहे. त्यामुळे येत्या २५ तारखेपर्यंत जागावाटपावर अंतिम निर्णय जाहीर केला जाईल अशी माहिती प्रशांत जगताप यांनी दिली.

चऱ्होलीतील दाभाडे सरदार पूल दुरुस्तीसाठी बंद

चऱ्होली । प्रतिनिधी

चऱ्होली बुद्रुक व चऱ्होली खुर्द या दोन्ही चऱ्होलीला जोडणारा सरसेनापती खंडेराव दाभाडे सरदार पुलाच्या दुरुस्तीचे काम करण्यात येणार आहे. त्यामुळे सदर पूल काही काळासाठी वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. त्यामुळे आळंदीतील अवजड वाहतूक या मार्गाने ओळविण्यात आली होती. परंतु, पुलाच्या कामामुळे आळंदी, देहू फाट्यावरील वाहतूक कोंडीत मोठी वाढ होणार आहे.

चऱ्होली आणि परिसरातील वाहतुकीचा कणा असणारा हा सरसेनापती खंडेराव दाभाडे सरदार पूल गेली अनेक दिवसांपासून खड्डेमय झाला होता. पुलाच्या चऱ्होली खुर्दकडील बाजूला बरेच अंतरापर्यंत मोठमोठे खड्डे पडले होते. त्यामुळे वाहतूक संथ गतीने होत होती. 'पुढारी'ने या पूर्वी ३ जून रोजी 'चऱ्होलीतील पुलावर वाहन



चालकांना अपघाताचा धोका : अरुंद पूल, खड्डे देताहेत अपघाताला निमंत्रण' या शीर्षकाखाली बातमी प्रसिद्ध केली होती. मात्र डोळ्यावर कातडे पांघरलेल्या प्रशासनाला जाग आली नाही. त्यामुळे 'पुढारी'ने पुन्हा एकदा २५ जून रोजी 'चऱ्होली पुलावर अपघाताचा धोका : प्रशासनाची एकमेकांकडे बोटे, नागरिक त्रस्त' या मथळ्यासह नागरिकांच्या सर्व मागण्या प्रसिद्ध केल्या होत्या. मात्र, तरीही प्रशासनाने वेळकाढू पणा केला. पण 'देर आये दुरुस्त आये' या उक्तीनुसार उशिरा का होईना प्रशासनाला जाग आली हे चांगले झाले.

चऱ्होली बुद्रुक, चऱ्होली खुर्द, आळंदी, धानोरे, सोळू, मरकळ, तुळापूर, फुलगाव या सर्व भागासाठी चऱ्होलीचा पूल म्हणजे जीवन वाहिनी आहे. कारण आळंदी हे महाराष्ट्रातील प्रमुख तीर्थक्षेत्र असल्यामुळे सर्व जड वाहतूक चऱ्होलीमार्गे वळवण्यात आली होती. त्यामुळे आळंदीतील वाहतुकीवर ताण पडत नव्हता. आता आळंदीतील वाहतुकीवर मोठा ताण निर्माण होऊन त्यामुळे आळंदीपासून लोणीकंद फाट्यापर्यंत वाहतूक कोंडी होणार आहे. आळंदीतील अंतर्गत रस्ते अरुंद असल्यामुळे संपूर्ण आळंदी शहरात देखील या पुढील काळात मोठी वाहतूक कोंडी राहणार आहे. त्याचा महाराष्ट्रातील विविध ठिकाणाहून येणाऱ्या भाविकांना मोठा त्रास सहन करावा लागणार आहे. आता लग्नसराई चालू झाल्यामुळे आळंदीत धर्मशाळा आणि कार्यालयाच्या सर्व परिसरात आणि रस्त्याने मोठ्या प्रमाणावर पाहुणेमंडळी आणि वऱ्हाडी मंडळींची गर्दी आहे. तसेच आजूबाजूचे परिसरातील देखील सर्व नागरिक कायमच लग्नसराईमुळे आळंदीत येत आहेत. चऱ्होलीतील पुलामुळे आळंदी येथील वाहतुकीवर नियंत्रण ठेवणे सोपे होते. आता जोपर्यंत चऱ्होलीतील पूल वाहतुकीसाठी पूर्ववत होत नाही तोपर्यंत आळंदी आणि परिसरातील नागरिकांना वाहतूक कोंडीला तोंड द्यावे लागणार आहे.